| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ६२ वा | रविवार दिनांक १० मे, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)-लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत महेबुब वय २४ वर्षे, महेश वय १९ वर्षे, आमीन तिघे रा. लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि. ०७.०५.२०२६ रोजी तावशीगड शिवारात महादेव मंदीरा जवळ माकणी ते तावशीगड जाणारे रोडवर पिकअप एमएच १३ एएन ६८७५ व अशोक लिलॅण्ड वाहन क्र एमएच२४ बीडब्ल्यू १५५३ मध्ये गोवंशीय जातीच्या १३ जर्शी गायी व १ वासरु एकुण २,२०,००० किंमतीचे वाहनासह १०,२०,००० किंमतीचे गोवंशीय जनावरे क्रुरपणे भरुन त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना लोहारा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(डी) (ई) (एच) सह मपोका कलम ११९ सह भा.न्या.सं. कलम ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### उमरग्यातून मोटारसायकची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दिगंबर भाउराव सुरवसे, वय ५७ वर्षे, रा. जुनी पेठ, उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांची अंदाजे २३,९५५ किंमतीची मोटरसायकल ही दि.०६.०५.२०२६ रोजी ओम बालाजी मंगल कार्यालय उमरगा येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे ये गुन्हा नोंदवला आहे.

### पाच लाखाच्या केबलची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि. ०३.०२.२०२६ रोजी खानापुर शिवारातील गट नं १४० मध्ये उभा असलेल्या पवनचक्की कंपनीचा केटी/०१ ह्या पॉईटवरील रोटा रेटर केबलवायर २२ मिटर लांबीचे कुण २४ बंडल एकुण ५,००,००० किंमतीचे चोरुन नेले. व चौतीस लाख रुपय किंमतीचे नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी बालाजी बाळासाहेब मोरे, वय २७ वर्षे, रा. इंदापुर ता. वाशी जि. धाराशिव यांनी वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## पोहायला गेलेला १९ वर्षीय युवक विहिरीत बुडाला, ७ तासांनी सापडला

परंडा(प्रतिनिधी)-तालुक्यातील भोंजा येथील शिवारातील विहिरीत पोहण्यासाठी गेलेल्या १९ वर्षीय युवक पाण्यात बुडाला सात तासाच्या शोधकार्या नंतर मृत अवस्थेत सापडला.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, कुंभेजा येथील युवक शुभम ननवरे (वय १९) पुणे येथे शिक्षण घेत होता. कुंभेजा येथे घरी धार्मिक कार्यक्रम असल्याने गावाकडे आला होता. शुक्रवारी (दि. ८) सकाळी आठच्या दरम्यान भोंजा शिवारात असलेल्या त्यांच्या शेतात पोहण्यासाठी गेला होता.

सदरील विहीर ५० फूट खोल होती. संपूर्ण पाण्याने काटोकाट भरलेली असल्याने युवकास पाण्याचा अंदाज आला नाही. पोहण्यासाठी सुळकी मारली असता पाण्यात बुडाला. सोबत पोहण्यास आलेल्या नातेवाइकांनी आरडाओरड केल्याने ग्रामस्त विहिरीकडे आले. अनेकांनी डुबकी घेऊन शोधण्याचा प्रयत्न केला.

सदरील युवक विहिरीत गाळात फसला होता. विद्युत पंप लावून पाणी उपसा केल्यानंतर सात तासांच्या अथक शोधकार्यानंतर दुपारी तीनच्या सुमारास मृतावस्थेत आढळून आला.शवविच्छेदन केल्यानंतर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## ज्ञानप्रबोधिनी अन् लोकसहभागातून जलक्रांती: सीईओंकडून वडगांववाडी ग्रामस्थांचे कौतुक



लोहारा (प्रतिनिधी)- जलतारा केल्यामुळे भूगर्भातील पाणीपातळी वाढून गाव टँकरमुक्त होईल, असे प्रतिपादन जिल्हा परिषद मुख्य कार्यकाऱ्यांनी तालुक्यातील वडगाववाडी येथील जलताराची पाहणी केली. त्यांनी यावेळी केले.

ज्ञानप्रबोधिनी केंद्र हराळी आणि वडगाववाडी येथील ग्रामस्थांच्या पुढाकारातून जलताराचे काम मोठ्या प्रमाणात सुरु आहे. आतापर्यंत जिल्ह्यात विक्रमी ८६३ जलतारा खड्डे पूर्ण झाले आहेत आणि अजूनही काम चालू आहे. गुरुवारी (दि.७) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांनी तालुक्यातील वडगांववाडी येथे जाऊन या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी समाधान व्यक्त करत ग्रामस्थांचे कौतुक केले. याठिकाणी जलतारा खड्डे घेण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. भविष्यात यामुळे भूगर्भातील पाणीपातळी वाढण्यास मदत होणार आहे. यावेळी सरपंच सोनाली गाडेकर, उपसरपंच अंकुश भुजबळ, माजी सरपंच वनमाला भुजबळ, ग्रामपंचायत अधिकारी आशिष गोरे,ग्राम महसूल अधिकारी दिपक रेड्डी, ज्ञानप्रबोधिनीचे समन्वयक सचिन सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्ते निकेश बचाटे, माजी सरपंच हरिदास गिराम, सहदेव गिराम, गणपती बोडके, विरनाथ पाटील, विष्णू बेळे, आदी यावेळी उपस्थित होते.

## उष्माघाताने वाशीत जनावरे दगावली, दूध उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत घट



वाशी (प्रतिनिधी)-यंदा उन्हाळ्यात वाढलेल्या उष्णतेच्या तडाख्याचा माणसांप्रमाणे जनावरांनाही फटका बसला आहे. उष्णतेच्या लाटेत अनेक जनावरे दगावल्याने वाशी तालुक्यातील पशुपालक शेतकऱ्यांना फटका बसला आहे. उन्हामुळे दूध उत्पादनातही मोठी घट झाली आहे. उष्माघातामुळे जनावरे दगावण्याचे प्रमाण वाढल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे.

वाशी तालुक्यात यावर्षी तापमानाने ४३ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. वाढत्या उष्णतेमुळे दुभती जनावरे आजारी पडत असून, दूध उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. दुधाचे उत्पन्न घटल्याने जनावरांच्या संगोपनाचा खर्चही निघणे कठीण झाले आहे. तालुक्यात शेळी-मेंढी वगळता सुमारे ३०,५०० गोवंशीय पशुधन असून, उष्माघात, निर्जलीकरण, संसर्गजन्य आजार आणि गोचीड तापामुळे जनावरांचे हिमोग्लोबिन कमी होऊन ती दगावत आहेत.

सरकारी दवाखान्यात औषधांचा कायम तुटवडा असल्याने शेतकऱ्यांना महागडी खासगी औषधे खरेदी करावी लागत आहेत. काही अधिकारी आणि औषध विक्रेते यांच्यातील संबंधांमुळे सामान्यांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोपही होत आहे.

पशुधन नुकसान भरपाईच्या नियमात बदलाची गरज सध्या वीज पडणे किंवा अतिवृष्टीमुळे जनावरे दगावल्यास सरकारी मदत मिळते. मात्र, उष्माघात किंवा संसर्गजन्य रोगांमुळे होणाऱ्या मृत्यूची यामध्ये तरतूद नाही. नियमात शिथिलता आणून उष्णतेमुळे दगावलेल्या जनावरांनाही भरपाई द्यावी, अशी मागणी पशुपालक करत आहेत.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क

### तुळजापूर,उमरगा व लोहारा तालुक्यातील सात प्रकल्पांतील पाणीसाठा पिण्यासाठी राखीव

धाराशिव दि.७ मे (जिमाका) जिल्ह्यात अल्प पर्जन्यमानाची शक्यता आणि भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.तुळजापूर,उमरगा आणि लोहारा तालुक्यातील सात पाटबंधारे प्रकल्पांमध्ये सध्या उपलब्ध असलेला पाणीसाठा पुढील आदेशापर्यंत पिण्याच्या वापरासाठी आरक्षित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी यासंदर्भात आदेश जारी केले आहेत.

उपकार्यकारी अभियंता,धाराशिव पाटबंधारे विभाग क्र.२,उमरगा यांच्या कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार,अल्प पावसामुळे आगामी काळात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.त्यानुसार संबंधित प्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठा जतन करण्याची शिफारस प्रशासनाकडे करण्यात आली होती.

प्रशासनाने राखीव केलेल्या प्रकल्पांमध्ये तुळजापूर तालुक्यातील सांगवी काटी लघुपाटबंधारे प्रकल्प, उमरगा तालुक्यातील आलूर लघुपाटबंधारे प्रकल्प व कोराळ साठवण तलाव प्रकल्प,तसेच लोहारा तालुक्यातील धानोरी लघुपाटबंधारे प्रकल्प,लोहारा लघुपाटबंधारे प्रकल्प,हिप्परगा लघुपाटबंधारे प्रकल्प आणि माकणीगाव (पी) साठवण तलाव प्रकल्पांचा समावेश आहे.

प्राप्त अहवालात नमूद केल्यानुसार, संबंधित सातही प्रकल्पांमध्ये समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध नसल्याने अवैध पाणी उपसा होऊ नये,यासाठी विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.तसेच या प्रकल्पांतील उपलब्ध पाणी केवळ नागरिकांच्या पिण्याच्या गरजांसाठीच नव्हे,तर परिसरातील जनावरांच्या पाण्याच्या आवश्यकतेसाठीही राखून ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.प्रशासनाच्या आदेशानुसार,संबंधित प्रकल्पांमधील पाणीसाठ्याचा जास्तीत-जास्त कालावधीपर्यंत पिण्यासाठी उपयोग होण्यासाठी पाण्याचे काटेकोर जतन करणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी पाटबंधारे विभाग व महसूल प्रशासनाकडून संयुक्त पातळीवर देखरेख ठेवली जाणार असल्याचे समजते.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी जारी केलेल्या या आदेशामुळे संभाव्य दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत ठेवण्यास मदत होणार आहे.

## जागतिक बँक तज्ज्ञांकडून स्मार्ट प्रकल्पाची पाहणी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कार्याचे कौतुक

धाराशिव, (जिमाका)- माननीय बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (डच-ठढ) प्रकल्पांतर्गत स्थापन झालेल्या धाराशिव तालुक्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कार्याची जागतिक बँकेच्या तज्ज्ञांनी पाहणी करत समाधान व्यक्त केले.ग्रामीण भागात उभारण्यात आलेल्या या प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ होत असल्याचे नमूद करत तज्ज्ञांनी कंपन्यांच्या कामकाजाचे विशेष कौतुक केले.धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथील पिकलँड फार्मर प्रोड्यूसर कंपनी तसेच किणी येथील वरदविनायक फार्मर प्रोड्यूसर कंपनी येथे ५ मे रोजी जागतिक बँकेच्या तज्ज्ञांनी भेट दिली.या भेटीदरम्यान कंपनीने आतापर्यंत केलेल्या उल्लेखनीय कार्याचा आढावा घेण्यात आला.

जागतिक बँकेचे तज्ज्ञ श्री. आदर्शकुमार यांनी पिकलँड फार्मर प्रोड्यूसर कंपनीच्या बियाणे प्रक्रिया युनिट व गोदाम बांधकामाची पाहणी केली.तसेच वरदविनायक फार्मर प्रोड्यूसर कंपनी,किणी येथील २० टीपीडी क्षमतेच्या अत्याधुनिक 'फुली ऑटोमॅटिक' दाळ मिल प्रकल्पाची माहिती घेतली.हे दोन्ही प्रकल्प पूर्णत्वास जाऊन कार्यान्वित झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी मार्केट लिंकेज,शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा,व्यवसाय आराखडा (बिझनेस प्लॅन) आदी विषयांवर संचालक व सभासदांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकरी सभासदांचे हित जपले जावे,अधिकाधिक शेतकऱ्यांना या कंपन्यांशी जोडून त्यांच्यापर्यंत योजनांचा फायदा पोहोचवावा,अशी अपेक्षा तज्ज्ञांनी व्यक्त केली.ग्रामीण भागात कार्यान्वित झालेल्या स्मार्ट प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना आर्थिक बळकटी मिळत असून कृषी व्यवसायाला चालना मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या भेटीदरम्यान विभागीय नोडल अधिकारी लातूर श्री.भास्कर कोळेकर,जिल्हा प्रकल्प अमलबजावणी प्रमुख तथा प्रकल्प संचालक आत्मा श्री.विष्णू मिसाळ, नोडल अधिकारी तडढ्ऋ श्री. चंद्रकांत माळी,नोडल अधिकारी झखण पुणे श्री.राजेंद्र साळवे,जिल्हा नोडल अधिकारी श्री.चेतन जाधव, जिल्हा व विभागीय अमलबजावणी कक्षातील अधिकारी व कर्मचारी, झरश्रश्ररवळींी टीम,तसेच संबंधित कंपनीचे संचालक व सभासद उपस्थित होते.

## सुराज्याचे शिल्पकार राजर्षी शाहू महाराजांना धाराशिवमध्ये अभिवादन



धाराशिव (शेख अंजुम)-सामाजिक न्याय, समता आणि प्रगतिशील विचारांचा वारसा जपणारे कोल्हापूर संस्थानचे अधिपती राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा ६ मे रोजी स्मृतीदिन धाराशिवमध्ये श्रद्धापूर्वक पाळण्यात आला. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर घडविणाऱ्या या महान राजर्षींना नागरिकांनी त्रिवार मुजरा केला.

येथील शाहू महाराज चौकात त्यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राजर्षी शाहू समितीचे अध्यक्ष बलराज रणदिवे, नगरसेवक पंकज भोसले, नगरसेवक सुनील आंबेकर, रोहित पडवळ, माजी नगरसेवक खलील सर, माजी नगरसेवक कुणाल निंबाळकर, मराठा महासंघाचे अध्यक्ष मोहन मुंडे, नगरसेवक नरसिंह मिटकरी, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष आकाश मुंडे, गणेश साळुंखे, प्रजय पवार, सर्फराज कुरेशी, बाळासाहेब गाडेकर, प्रशांत सावंत, शहानवाज सय्यद, ओम नाईकवाडी, वाजिद सय्यद आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव करत, त्यांच्या सामाजिक समतेच्या विचारांचा आदर्श आजच्या पिढीने घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

## राष्ट्रीय बंजारा परिषद धाराशिव जिल्हाध्यक्षपदी सुधाकर राठोड



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथील सामाजिक कार्यकर्ते सुधाकर शिवाजी राठोड यांची राष्ट्रीय बंजारा परिषद राजकीय परिषदेच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे गोरबंजारा समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

राष्ट्रीय बंजारा परिषद संस्थापक तथा राष्ट्रीय समन्वयक गोर बंजारा हृदयसम्राट श्री किसन भाऊ राठोड राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मोहन चव्हाण राष्ट्रीय कार्याध्यक्ष ॲड पंडित राठोड, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नायक उमेश भाऊ राठोड राजकीय परिषद प्रदेश अध्यक्ष श्रावण पवार यांनी ही निवड जाहीर केली आहे.

सुधाकर राठोड हे गेल्या अनेक वर्षांपासून धाराशिव जिल्ह्यात गोरबंजारा समाजाच्या विविध प्रश्नांवर सातत्याने काम करत आहेत. समाजातील न्याय, हक्क, अधिकार आणि मान-सन्मानासाठी ते नेहमीच सक्रिय राहिले आहेत. समाजाच्या परिस्थितीनुसार उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी पाठपुरावा केला आहे. अशा या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची धाराशिव जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. सुधाकर राठोड यांच्या निवडीमुळे समाजातील तरुण कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा मिळणार असून भविष्यात समाजाच्या विविध प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या निवडीबद्दल समाजबांधव, मित्रपरिवार तसेच विविध संघटनांच्या वतीने शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत छगन रा. पारधी पिढी ता. भुम जि. धाराशिव हे दि.०६.०५.२०२६ रोजी मोटरसायकल, ही तहसील कार्यालय समोर भुम येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## गरज वचनपुर्तीची...

देशातील प्रमुख राज्याच्या विधानसभेची निवडणुक पार पडल्या. देशाचे लक्ष प. बंगालच्या निवडणुकीकडे अधिक होते. चौथ्यावेळी ममता बॅनर्जी विराजमान होणार का, भाजपा सत्ता काबिज करणार! असा प्रश्न सतावत होता. भाजपाने पहिल्यांदाच प. बंगालमध्ये सत्ता मिळविण्यासाठी अनेक वर्षापासून प्रयत्न केले होते. केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांचा दौरा सतत चालू होते. तेथील परिस्थितीवर अभ्यास चालू होता. दक्षिणेत भाजपाला सत्ता मिळविणे तसे आवघड होते. एक तर दक्षिणेत स्थानिक पक्षाचे वर्चस्व आहे. तामिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल मध्ये प्रादेशिक पक्षाची चलती आहे. राष्ट्रीय पक्षाला सत्ता आज पर्यंत अधिक काळ मिळाला नाही. त्यामुळे भाजपाला एन्ट्री अशक्य होती. तरी पंतप्रधान यांचे डावपेच प. बंगालमधील ढासाळत चाललेली कायदा व सुव्यस्थेमुळे भाजपाला यश मिळविता आहे. आंध्रा, तेलंगाण, कर्नाटकात भाजपाला शिरकाव करणे आवघड आहे. तरी आसाम व बिहारमध्ये भाजपाने आपले बस्तान बसविले आहे. भाजपाला माहिती आहे की, जनतेची कामे केली पाहिजेत. सत्तेसाठी व सत्ता टिकविण्यासाठी जनतेच्या मनातील योजना राबविल्या पाहिजेत. तरच स्वबळावर सत्ता मिळविता येते. हे ओळखले आहे. महाराष्ट्रात युती व आघाडीचे सरकार होते. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना व भाजपाला एकहाती सत्ता मिळविता आली नाही. पुर्वी केवळ काँग्रेसचा बोलबाला होता. मग गाय-वासरू चिन्ह असो पंजा, जनता इंदिरा गांधीजी असे पर्यंत विसरले नव्हते. काँग्रेला पर्याय जनता पक्ष होता. अंतर्गत बंडाळीने तो विखुरला गेला. जनता दला सारखे नेते मंडळी नव्हती. असो काळ बदलला गेला. काँग्रेस पक्षाला भाजपा हा भक्कम असा पर्याय लाभला. संघाच्या सानिध्यात वाढलेला पक्ष म्हणून बघितले जाते. भाजपाचे सुरवातीच्या काळात लोकसभेत दोनच खासदार निवडुण आले तेही स्वकर्तृत्वावर आले होते. भाजपाकडे देशातील नागरिकांची वेगळी नजर आहे. एक राष्ट्रीय विचाराचा पक्ष म्हणून बघितले जाते. कालांतराने एक-एक राज्य भाजपामय करण्यात यश आले. प.बंगालमध्ये राष्ट्रीय पक्ष भाजपाला यश मिळविता आले कारण मतदार जनतेची मने जिंकली गेली. दक्षिणेत राष्ट्रीय पक्षाला सर्वात मोठी मेहनत घ्यावी लागते. तामिळनाडूमध्ये काय स्थिती आहे. आंध्रा, तेलंगाण आदि ठिकाणाचा विचार केला तर जतनेला विकास हवा आहे. कायदा व सुव्यवस्थेची गरज आहे. पुर्वी तशा मोफत योजना किंवा घोषणा नव्हत्या किंवा जाहिर ही करीत नव्हते. सध्याला अनेक मोफत योजनाच्या घोषणेचा महापूरच आहे. असो, आता पाच राज्याच्या निवडणुकीत भाजपाला तीन ठिकाणी यश मिळविता आले. त्यामुळे यापुढे दिलेल्या आश्वासनाची पुर्ती ही सर्वात महत्त्वाची आहे. देशात सर्वात कठिण स्थिती ही बंगालची आहे. येथे भाजपाला कायमस्वरूपी यश मिळविण्यासाठी घुसखोरांचा शोध घेणे आवश्यक आहे. देशविरोधी काम करणाऱ्याची संख्या अधिक आहे. अशांचा शोध घेवुन बुलडोझर बाबाचे अनुकरण करावे लागणार आहे. पोकळ धोरण जर प. बंगालमध्ये स्विकारले तर अल्पावधित पायउतार व्हावे लागेल. सर्वात कठिण काम हे घुसखोरांना शोधणे, घुसखोरी रोखणे व हिंदुविरोधी संघटनास पायबंद घालणे. हे काम करताना कायदा व सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. आसाम मध्ये मोठ्या प्रमाणात घुसखोरी झाली मात्र भाजपाने ते रोखली, सीमावर्ती देश आहे. सहज घुसखोरी होते. यामुळे परिस्थिती हाताळणे आवघड आहे. देशात केवळ प.बंगालमध्ये घुसखोरी किंवा देशविरोधी काम करणारे आहेत असे नाहीत, महाराष्ट्रात असतील मात्र ते शोधावे लागणार आहे. शोधले तर सापडतील. राज्यात देशविरोधी संघटन कार्यरत आहे. त्यांचे काम देशविरोधी करणाऱ्यांना संरक्षण देणे, घरात जागा देणे आहे हे उघड होताना दिसून येत आहे. देशविरोधी संघटनाचे एकच कार्यक्रम हाती घेतलेला नसतो. विविध देशविरोधी कार्यक्रम राबविले जातात. जसे बनावट नोटा चलनात आणणे, धर्मपरिवर्तनास भाग पाडणे, समाजातील दुर्लक्षित समाजाला आपले करणे, त्यांना मदत करणे, शस्त्रास्त्रे बाळगणे आदि विविध कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे याचा शोध घेणे मोठे आवघड आहे. कोणत्या पद्धतीने देश विरोधी काम करतील हे सांगता येत नाही. त्यामुळे जसे योगी बाबा सतर्क आहेत तसे प. बंगालमध्ये सतर्क राहावे लागणार आहे. महाराष्ट्रात भाजपाला स्वबळावर सत्ता मिळविण्यासाठी कार्य ठोस उपक्रमाची गरज आहे. देशात उत्तरप्रदेश तसे महत्त्वाचे राज्य आहे तसे महाराष्ट्र देखिल आहे. उत्तर प्रदेशात जसे काम चालते तसे महाराष्ट्रात नाही. भाजपाने आता पर्यंत मित्र पक्षाच्या मदतीने बावीस राज्य ताब्यात घेतले आहेत. काँग्रेसला विचार करायाला लावणारी बाब भाजपाने निर्माण केली आहे. काँग्रेसला मजबुत पर्याय भाजपा जनतेला लाभला आहे. आसाम, प. बंगालमधील परिस्थितीचा विचार हा मतदार नागरिकांनी केला आहे. मुळात आपल्या देशात घुसखोरीबाबत कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही. घुसखोर आले किती, कशासाठी आले, पासपोर्टचा कालावधी संपला तरी ते कसे भारतात राहातात. आदि बाबात कधीही ठोस पावले उचलेली जात नाहीत. विशेष करून एक सक्षम यंत्रणेचा अभाव आहे. गुन्हेगार गुन्हा करून तो लवकर सापडत नाही. एक नाशिक मधील गुन्हा करणारी महिला छत्रपती संभाजीनगरात किती दिवसानंतर हाती लागते. गुन्हगार शोधयाला एवढा विलंब लागत असेल तर यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही. असे होत असेल तर घुसखोरांना शोधणे अग्निदिव्यच म्हणावे लागेल! त्यामुळे आज प. बंगालमध्ये सत्तापरिवर्तन झाले म्हणून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न मार्ग लागणार आहे. यापुर्वी घुसखोरी करणारे देशद्रोही इतर प्रांतात सग्यासोयऱ्याकडे वळतील त्यावेळी काय करणार आहोत? त्यामुळे या बाबत यंत्रणा सक्षम असली पाहिजे. काही झाले तरी देश सुरक्षित असला पाहिजे. देशाला धोका हा इतर देशाकडून नाही. पाकिस्तान किंवा बांगला देशाकडून नाही तर देशात प.बंगालमध्ये जे घुसखोरी केली आहे त्यापासून होवू शकतो. देशविरोधी मिशन चालविणाऱ्याकडून आहे हे प. बंगालमधील परिस्थितीचा विचार करून सतर्क झाले पाहिजे. भाजपाने सुद्धा कायदा व सुव्यवस्था राखत दिलेल्या आश्वासनाची पुर्ती केली पाहिजे.

# सुधारित पेन्शन योजनेचा अन्वयार्थ

१ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय व निमशासकीय सेवेत आलेल्या व राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे त्याच्या कार्यपद्धती बाबतचा शासन निर्णय ६ मे रोजी प्रसिद्ध झाला आणि राज्यातील कर्मचाऱ्यांच्या जुनी पेन्शनच्या मागणीला रीतसर बगल देत सरकारने सद्यस्थितीत लागू असलेल्या एनपीएस सोबत यूपीएस व सुधारीत असे आणखी पर्याय उभे करून कर्मचारी वर्गात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आजमितीला कर्मचारी वर्गात पेन्शन योजनांच्या विकल्पांचा सावळा गोंधळ निर्माण झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. या पार्श्वभूमीवर सुधारित पेन्शन योजनेच्या कार्यपद्धती शासन निर्णयातील ठळक तरतुदी व अनुउत्तरीत प्रश्नांवर दृष्टीक्षेप टाकत निर्णयाचा अन्वयार्थ लावण्यासाठीचा हा लिखाण प्रपंच.

महाराष्ट्र शासनाने ३१ ऑक्टोबर २००५ रोजी अधिसूचना काढत १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शासकीय व निमशासकीय सेवेत नव्याने रुजू होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन योजना (जुनी पेन्शन-१९८२) रद्द करून नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली. तदनंतर १ एप्रिल २०१५ मध्ये महाराष्ट्र शासनाने या योजनेचे रुपांतर केंद्राच्या राष्ट्रीय निवृतीवेतन योजनेत (NPS) करण्यात आले. आजमितीला महाराष्ट्रात विविध आस्थापने-वरील ८ लाख २७ हजार कर्मचारी हे राष्ट्रीय निवृतीवेतन योजनेचे सभासद आहेत.

नवीन पेन्शन योजनेत सेवानिवृतीनंतर संबधित कर्मचाऱ्यास मिळणारी रक्कम हि शेअर बाजारातील नफा-तोटा यावर आधारित असल्यामुळे मिळणाऱ्या अनिश्चित स्वरूपाच्या लाभामुळे त्यांना वृद्धापकाळात सन्मानाने जीवन जगता येणे कठीण ठरत होते. मागील १९ वर्षातील नवीन पेन्शन योजनेचे योजनेचे फसवे स्वरूप लक्षात घेऊन १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी अशी मागणी राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने सातत्याने विविध आंदोलने, मोर्चे, उपोषणे, संप आदि माध्यमातून केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाकडून माजी सनदी अधिकारी सुधीर श्रीवास्तव, के. पी.बक्षी व सुबोध कुमार अशी त्रिसदस्यीय समिती केली होती. या समितीने राष्ट्रीय निवृतीवेतन प्रणाली व जुनी पेन्शन यांचा तुलनात्मक अभ्यास करून या योजने-तील कर्मचाऱ्यांना सेवानिवृतीनंतर खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना बाबतची शिफारशी करणारा अहवाल सादर केला होता. या अहवालातील शिफारसींना अनुसरून राज्य अर्थसंकल्पीय अधिवेशनात १ मार्च २०२४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी राज्य कर्मचार्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे जुनी पेन्शन जशास तशी लागू न करता सध्याच्या राष्ट्रीय निवृतीवेतन योजनेमध्येच सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेच्या तत्वाचे पालन करत सुधारित पेन्शन योजना लागू करण्याची घोषणा विधीमंडळात केली होती. त्यास अनुसरून २० सप्टेंबर २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून याबाबतचा उल्लेख केला होता मात्र या योजनेची कार्यपद्धती स्पष्ट नसल्यामुळे विकल्प देण्यास अडचणी येत आहेत हि बाब लक्षात घेऊन ६ मे रोजी कार्यप्रणाली बाबत शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे.

### शासन निर्णयातील ठळक तरतुदी

* एनपीएस योजनेतील सर्व कर्मचाऱ्यांना सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना ही १ मार्च २०२४ पासून लागू असणार आहे.
* केंद्राच्या एकीकृत योजनेत सहभागी व्हायचे की राज्याच्या सुधारित निवृत्तीवेतन योजना स्वीकार करायची याबाबतचा विकल्प ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आपल्या कार्यालय प्रमुखांकडे सादर करावयाचा आहे.
* कर्मचाऱ्याची २० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा झाली असल्यास, त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या (Basic Pay) ५०% निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ अनुज्ञेय राहील.
* २० वर्षा पेक्षा कमी व १० वर्षपेक्षा जास्त सेवा असल्यास कर्मचाऱ्याच्या शेवटच्या वेतनाच्या आधारे त्याच्या सेवेच्या प्रमाणात निवृत्तिवेतन अनुज्ञेय करण्यात येईल.
* किमान १० वर्षांच्या सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यावर किमान निवृत्तिवेतन रु.७.५००/- इतके राहील.
* १० वर्षापेक्षा कमी सेवा असल्यास या योजनेंतर्गत निवृत्तिवेतन अनुज्ञेय राहणार नाही.
* कर्मचाऱ्याच्या निवृत्तिवेतनाच्या ६०% इतके कुटुंब निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ अनुज्ञेय राहील.
* जे कर्मचारी सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना स्वीकारतील त्यांच्या निवृत्तीच्या वेळी त्यांनी त्याच्या PFRDA
* यांच्याकडे जमा झालेल्या अंशदानाच्या संचित निधीमधून प्राप्त होणाऱ्या ६०% परताव्याची रक्कम आहरण व संवितरण
* अधिकारी यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे.
* कर्मचाऱ्याने ४०% संचित निधीवर Annuity Service Provider कडून प्राप्त होणाऱ्या वार्षिकीचा (Annuity) तपशिल संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत अनुज्ञेय निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ या रकमेमधून वार्षिकीची (Annuity) रक्कम वजा करुन राज्य शासनाकडून देय निवृत्तीवेतन निश्चित केले जाईल.
* संचित निधीमधून कोणत्याही प्रकारची यापूर्वी काढलेली रक्कम १०% व्याजासह भरणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांना सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजने अंतर्गत निवृत्तिवेतन त्या प्रमाणात अनुज्ञेय ठरेल.
* राजीनामा दिलेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन अनुज्ञेय राहणार नाही, फक्त राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत सर्व लाभ अनुज्ञेय राहतील.
* सेवा उपदान उपदान लागू राहील.

सदरील शासन निर्णयास शासनाने कार्यपद्धती निर्णय म्हणून संबोधिले असले तरी या निर्णयाने आणखी नव्या प्रश्नांना जन्म दिला असून कर्मचारी वर्गाच्या दृष्टीने यामध्ये अनेक बाबींची स्पष्टता नसल्यामुळे पेन्शन योजनांच्या विकल्पांच्या गोंधळात आणखी भर पडली आहे असे चित्र आहे.

### शासन निर्णयातील अनुउत्तरीत प्रश्न ?

* १ मार्च २०२४ पूर्वी सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल का ?
* यूपीएस योजने प्रमाणे यामध्ये जपश थरू डुळींलह (पूर्वीच्या योजनेत परत एकदा परतण्याची) मुभा उपलब्ध आहे का ?
* वेतन आयोगाच्या पुनर्रचनेनुसार निवृत्तीवेतन पुनर्रचना लागू असणार का?
* रजा रोखीकरण, अंशराशीकरण, गट विमा व विकलांग पाल्य (मुला-मुलींना) निवृत्तीवेतन मिळेल का ?
* पेन्शन वाढ ( वय वषे ८० ते १००) बाबत तरतूद करण्यात आली आहे का?
* कर्मचाऱ्यांना अडचणीच्या प्रसंगी जीपीएफ प्रमाणे संचित रक्कम काढता येईल का ?
* सदरील योजना सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांना (सेवा कालावधी अल्प/दीर्घ) सारखे लाभ देईल काय ?
* मयत कर्मचारी यांचे कुटुंबास कुटुंब निवृत्तिवेतन व मृत्यू उपदान सोबतच कर्मचारी अंशदान जमा रक्कम परत मिळेल काय ?
* कर्मचाऱ्याची २० वर्षा पेक्षा कमी व १० वर्षापेक्षा जास्त सेवा असल्यास किती निवृत्तीवेतन मिळेल याचे सूत्र काय असेल (प्रमाण म्हणजे नक्की काय? )
* कर्मचाऱ्याने ४०% संचित निधीवर Annuity Service Provider कडून प्राप्त होणाऱ्या वार्षिकीचा (Annuity) तपशिल संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना दरमहा देणे आवश्यक आहे की केवळ एकदा ?
* पेन्शन वितरण व्यवस्था हि स्वतंत्र निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापन कक्षा मार्फत राहणार आहे की कोषागार कार्यालय यांचे मार्फत असणार?
* पेन्शन अनुषंगाने निर्माण होणारे प्रश्न / तक्रार निवारण करण्यासाठी यंत्रणा स्थापन केली जाणार आहे का?
* सुधारित पेन्शन योजनेची विस्तृत कार्यपद्धती (पेन्शन समीकरण, प्रस्ताव प्रारूपे आदि) संबंधित विभागाकडून दिली जाणार आहेत काय?
* नियत वयोमानापूर्वी कर्मचाऱ्याने स्वेइच्छेने राजीनामा दिल्यास निवृत्तीवेतन मिळेल का ?

वास्तविक पाहता केंद्र सरकारच्या सेवेत असलेल्या व सध्याच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे (एनपीएस) सभासद असलेल्या एकूण २४,६४,४३७ कर्मचाऱ्यांपैकी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत केवळ १,२२,१२३ म्हणजेच केवळ ४ टक्के कर्मचाऱ्यांनी युपीएस योजनेचा विकल्प भरून दिला असल्याची माहिती केंद्रीय वित्त राज्य मंत्री श्री. पंकज चौधरी यांनी लोकसभेत दिली असून यावरून देशभरातील कर्मचाऱ्यांनी या योजनेला नापसंती दर्शविली असल्याची बाब स्पष्ट झाली आहे.

त्यामुळे सद्यस्थितीत प्रचलित एनप-ीएस, केंद्राची यूपीएस, राज्याची सुधारित व म. ना. से नियम १९८२ ची जुनी पेन्शन योजना यामधील लाभ विषयक तरतुदींचा व ठळक वैशिष्टयांचा तुलनात्मक पा-तळीवर अभ्यास केला असता केवळ 'जुनी पेन्शन' योजनाच कर्मचार्यांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेच्या दृष्टीने खात्री देऊ शकते असे पहावयास मिळते त्यामुळेच जुनी पेन्शनच्या मागणीवर राज्यातील कर्मचारी ठाम राहतील असे पहावयासमिळते.

आजवर पेन्शन योजनेत कोणताही बदल आम्ही करणार नाही अशी विधा-ने करणाऱ्या मंडळीना कर्मचारी वर्गाने आपल्या एकजुटीच्या बळावर व सातात्यपूर्ण लढ्यातून मयत कर्मचाऱ्यांना कुटुंब निवृत्तीवेतन, मृत्यू उपदान, विकलांग निवृत्तीवेतन, सेवा उपदान यासारखे मौलिक हक्क प्रदान करण्यासाठी भाग पाडले असून आता तर मूळ वेतनाच्या ५० टक्के पेन्शन अधिक महागाई भत्ता देय करणे पर्यंत आणून ठेवले आहे. नक्कीच या नवीन पेन्शन योजनेची वाटचाल जुनी पेन्शनच्या दिशेने होऊ शकते हे दाखवून दिले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या अर्थविषयक व कर्मचारी वर्गाच्या बाबतच्या धोरणांवर दृष्टिक्षेप टाकला असता जुनी पेन्शनचा लढा वाटतो तितका सोपा नसून त्यासाठी संघर्ष अटळ आहे ही बाब कर्मचारी देखील जाणून आहेत. प्राप्त परिस्थितीत केंद्र व राज्य सरकारला आपल्या कर्मचारी विर-ोधी धोरणांचे पुनर्विलोकन करण्यास भाग पाडण्यात कर्मचारी यशस्वी झाले आहेत हे ही नसे काही थोडके !!!



डॉ.अमोल लाटे
सदस्य, कार्यकारी मंडळ
महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ
(एम.फुक्टो), मो. ९८८१८२३४९८

# ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राचा निकाल १००%

**लातूर/प्रतिनिधी :** प्रयोगशील व उपक्रमशील ज्ञानप्रकाश बालविकास केंद्रात मुलांसाठी केवळ अभ्यास एके अभ्यास न करता मुलांना विकासाच्या वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात . त्यातून मुलांचे अनुभव आणि भावविश्व विस्तारित करण्याचे प्रयत्न केले जातात. ज्यात कला, क्रीडा, संस्कृती, विज्ञान, तंत्रज्ञान या उपक्रमाबरोबरच वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मान्यवरांच्या भेटी प्रार्थना सभेच्या माध्यमातून मुलांसाठी घडवून आणल्या जातात. त्यातून मुलांना आपसूकच भविष्यातील संधी आणि आपल्या आवडी जोपासण्याचा मंत्र दिला जातो. हे सर्व करत १० वी वर्गाचे अभ्यासाचे नियोजन व मार्गदर्शन चालू असते. अनुभवी शिक्षक आणि दुरदृष्टी असण-ारे संस्थाचालक यांच्या सहवासात मुले ताणमुक्त वातावरणात शिकतात . प्रकल्पात मुलांना अधिक काळ राहून शिकता यावं. यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन व समुपदेशन ही केले जाते. इथे त्यांना स्वअभ्यासाची सवय लागते . त्यामुळे शालांत परीक्षेच्या निकालात हे परिणाम दिसून येतात.जाहीर झालेल्या निकालात एकूण ८५ विद्यार्थी होते . त्यातून ३ विद्यार्थ्यांनी १००% गुण घेतले आहेत. यात अवधूत म्हेत्रे , हर्ष अपसिंगे आणि संस्कार राऊतराव यांचा समावेश आहे.तर ९०% हुन अधिक गुण घेणारे ४५ विद्यार्थी, ८५ ते ९०% गुण घेणाऱ्यांमध्ये १९ विद्यार्थी आहेत. इतर सर्व विद्यार्थी विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. सर्व विद्यार्थी , पालक व शिक्षकांचे प्रकल्पप्रमुख सतीश नरहरे व संचालिका , मुख्याध्यापिका, सविता नरहरे, उपमुख्याध्यापक शिवशंकर राऊत ,पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, मार्गदर्शक प्रशांत शिंदे, वसंत पाटील, संतोष आळंदकर, शुभदा पाठक, शिवकांता जाधव, सुचेता चाकूरकर, विठ्ठल अलमलकर, जावेद सर आणि सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले .

## भाजताना चपाती का फुगते?



आई गॅसवर तवा ठेवून त्यावर जेव्हा चपाती भाजत असते त्यावेळी ती फुगते. अशी गरमागरम चपाती खाण्यासाठी आपण नेहमीच उत्सुक असतो. गरम फुगलेली चपाती खाताना बरेचदा भाजी आवडीची नसली तरीही मग ती खाल्ली जाते.

पण मित्रांनो, तव्यावर ठेवलेली ही चपाती का फुगते यामागचे शास्त्रीय कारण तुम्हाला माहीत आहे का? कणिक मळताना आपण गव्हाच्या पिठात पाणी टाकतो आणि मळलेल्या कणकेतून एक गोळा घेऊन त्याची चपाती बनवतो.

तव्यावर एक बाजू शेकल्यानंतर दुसरी बाजू जेव्हा उलटवतो त्यावेळी उष्णतेमुळे त्या कणकेतील पाण्याची वाफ होते. ही वाफ आणि तयार झालेला कार्बन डायऑक्साईड चपातीच्या दोन थरात राहतो. त्यातून तो बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करत असतो. या दाबामुळे चपाती फुगते.

या फुगलेल्या चपातीला एखाद्या ठिकाणी छिद्र पडले तर हा तयार झालेला गॅस आणि वाफ त्यातून बाहेर पडते आणि चपाती पुन्हा आधीसारखी न फुगलेली राहते. बरेचदा या वाफेपुढे हात आला तर जोरात चटका बसतो. हेच तत्त्व कढईत तेलामध्ये पुऱ्या तळताना दिसून येते.

या दाबामुळे चपाती फुगते. या फुगलेल्या चपातीला एखाद्या ठिकाणी छिद्र पडले तर हा तयार झालेला गॅस आणि वाफ त्यातून बाहेर पडते आणि चपाती पुन्हा आधीसारखी न फुगलेली राहते. बरेचदा या वाफेपुढे हात आला तर जोरात चटका बसतो. हेच तत्त्व कढईत तेलामध्ये पुऱ्या तळताना दिसून येते.

## गूढ चुंबकीय टेकडीचे




लडाखमधील लेहपासून जवळ असलेली मॅग्नेटीक हिल किंवा चुंबकीय टेकडी निसर्गाचा एक चमत्कार मानली जाते. या टेकडीत प्रचंड चुंबकीय आकर्षण आहे आणि त्यामुळे गाड्या या टेकडीवर खेचल्या जाऊन आपोआप वरती जातात तसेच या क्षेत्रावर उडणार्या विमानांनाही खेचले जाण्याच्या भीतीने आणखी उंचावरून उडावे लागते, अशा समजुती आहेत. खरे पाहता या चुकीच्या समजुती आहेत. विविध वस्तू या टेकडीवर आपोआप चढताना लोकांना दिसतात हा खरे तर दृष्टीभ्रम आहे. वास्तविक या टेकडीच्या विशिष्ट मांडणीमुळे असा दृष्टीभ्रम होतो.

या टेकडीभोवतीच्या परिसराची नैसर्गिक मांडणी अशी आहे की या टेकडीवरील किंचित खाली येणारा उतार हा चढ आहे असे भासते. हा दृष्टीभ्रम आहे. यामुळे गिअर नसलेली गाडी वरती चढते आहे असे वाटते. आहे की नाही गंमत?

अशा प्रकारच्या गुरूत्व टेकड्या जगभरात विविध ठिकाणी आहेत. अशा टेकड्यांवरील उतार हा दृष्टीभ्रम असतो. असा भ्रम निर्माण होण्यामागे पूर्ण किंवा बहुतांश अडथळा असलेले क्षितिज हा घटक असतो.

क्षितिज नसेल तर एखाद्या पृष्ठभागावरील उताराचे आकलन होणे कठीण जाते कारण हे आकलन होण्यासाठी आवश्यक असलेला संदर्भ म्हणजे क्षितिजच नसते. अशावेळी जमिनीला लंब करून उभ्या आहेत असे भासणार्या वस्तू (उदा. झाडे) प्रत्यक्षात वाकलेल्या असतात.

सर्वसामान्यपणे डोंगराळ भागातील रस्त्याचा पट्टा हा तो स्तर असतो जिथे क्षितिज धूसर होते, मग एरवी आपल्याला सरळ उभ्या असलेल्या भिंती किंवा झाडांसारख्या वस्तू किंचित वाकलेल्या दिसतात. यातून दृष्टीभ्रम तयार होऊन खाली जाणारा उतार वर जाणारा चढ आहे असे भासू लागते आणि वस्तूही वर जात आहेत असे दिसू लागते. काही वेळा तर नद्याही गुरूत्वाकर्षणाच्या विरुद्ध वाहताना दिसतात.

## १३ चंद्र असलेला नेपच्युन

नेपच्युनच्या दक्षिण ध्रुवावरील सर्वात वरच्या ट्रॉपोस्फीअर भागातील तापमान हे इतर भागातील तापमानापेक्षा १० डीग्री सेंटीग्रेटने गरम असल्याचे २००७ मध्ये केलेल्या संशोधनात सिद्ध झाले. या तापमानातील फरकामुळे या भागातून मिथेन वायू बाहेर पडतो तर बाकी ठिकाणी तो बर्फामधे असतो.

नेपच्युनवरील मोठा डाग हा त्याच्या झुकलेल्या अक्षामुळे तसेच हा भाग म्हणजेच दक्षिण ध्रुव गेली चाळीस वर्षे सूर्याच्या समोर राहिल्यामुळे आहे. नेपच्युनची भ्रमणकक्षा ही १.७७ डिग्री इतकी कललेली असल्यामुळे ती लंबगोलाकार आहे.

या लंबवर्तुळाकार कक्षेत भ्रमण करताना सूर्य आणि नेपच्युनचे अंतर १०१ कोटी कि.मी. इतके असते. या भ्रमणकक्षेत पेरीहेलीऑन आणि ॲफेलीऑन हे अनुक्रमे सगळ्यांत जवळचा आणि लांबचा बिंदू आहेत. जसा पृथ्वीला एक चंद्र आहे तसे नेपच्युनला १३ चंद्र आहेत. नेपच्युन आपण कधीही उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नाही. एखाद्या शक्तिशाली दुर्बिणीतूनच आपण युरेनसबरोबर नेपच्युनला पाहू शकतो. नेपच्युनची सूर्याभोवती फिरण्याची गती खूपच मंद असल्यामुळे पृथ्वीच्या जवळून जाताना इतर ग्रह त्याच्या विरुद्ध दिशेने जात असल्याचा भास होतो. १८४६ मध्ये तो पृथ्वीच्या जवळून जात असताना त्याचा शोध लागला. व्हॉयेजर २ या अवकाशयानाने २५ ऑगस्ट १९८९ रोजी नेपच्युनची सर्वात जवळची छायाचित्रे घेतली. या अवकाशयानाने सिद्ध केले की युरेनस ग्रहाप्रलमाणेच नेपच्युनभोवतीही चुंबकीय क्षेत्र आहे. या अवकाशयानानंतर म्हणजे १९८९ नंतर दुसरे कोणतेही यान नेपच्युनच्या जवळ गेले नाही.

# वजन कमी आणि सौंदर्यासाठी आवळ्याचा जादुई फॉर्म्युला





मुंबई : वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत आवळ्याची भूमिका महत्त्वाची आहे. तो शरीरातील चयापचय वाढवतो आणि चरबी जळण्याची गती सुधारतो. याशिवाय भूक आणि अनावश्यक खाण्याची इच्छा नियंत्रित ठेवण्यासही तो मदत करतो. त्यामुळे निरोगी केस, त्वचा आणि सडपातळ शरीर हवे असल्यास आवळ्याचा आहारात नियमित समावेश करा.

शरीर निरोगी ठेवण्यासाठी योग्य आणि संतुलित पोषण मिळणे अत्यंत आवश्यक असते. व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने परिपूर्ण असलेला आवळा हा आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त मानला जातो. केस, त्वचा आणि पचनाशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यासाठी आवळ्याचा वापर फायदेशीर ठरतो. आहारात आवळ्याचा समावेश अनेक प्रकारे करता येतो - काहीजण तो भाजी स्वरूपात खातात, तर काहींना कच्चा आवळा खाणे आवडते.

रस तयार करण्यासाठी लागणारे साहित्य - आवळा, कच्ची हळद, आले, कढीपत्ता आणि काळी मिरी.हा रस तयार करण्याची पद्धत अगदी सोपी आहे. एका आवळ्यासोबत कच्च्या हळदीचा एक छोटा तुकडा, आल्याचा तुकडा आणि चिमूटभर काळी मिरी घ्या. हे सर्व घटक मिक्सरमध्ये एकत्र वाटून रस तयार करा. सकाळी रिकाम्या पोटी हा रस प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात. दररोज या रसाचे सेवन केल्याने त्वचेला नैसर्गिक तेज येते, केस मजबूत व मऊ राहतात आणि वजन कमी होण्यासही मदत होते. जर तुम्हाला केसगळती कमी करायची असेल आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणायची असेल, तर या पेयाला तुमच्या दिनक्रमाचा भाग जरूर बनवा.

# दही आणि ताक उन्हाळ्यात पोटाच्या आरोग्यासाठी काय ?



मुंबई : उन्हाळ्याचा तडाखा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यामुळे अनेकजण उन्हाळ्यात दही आणि ताक घेणं पसंत करतात. उन्हाळ्याची सुरुवात होताच बऱ्याच घरांमध्ये जेवताना नियमितपणे दही किंवा ताकाचं सेवनं करतात. या दोन्ही पदार्थांमध्ये प्रोबायोटीक्स अर्थात पोटासाठी फायदेशीर ठरणारे बॅक्टेरिया असतात. मात्र, फार कमी लोकांना हे माहित आहे की यापैकी आपल्या पोटाच्या आरोग्यासाठी नेमकं काय फायदेशीर आहे? चला तर जाणून घेऊयात दही आणि ताक या दोन्हींपैकी नक्की काय फायदेशीर ठरेल याबद्दल.

दह्यात प्रोटीन आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. जर तुम्हाला वजन वाढवायचं असेल किंवा हाडे मजबूत करायची असतील, तर दही उत्तम आहे. आयुर्वेदानुसार, दही हे निसर्गात उष्ण प्रवृत्तीचं मानलं जातं. दही खाल्यानंतर पोटातील उष्णतेमुळे त्याचे आंबवण्याचे कार्य वाढते, ज्यामुळे काही लोकांना सिडिटी किंवा पोट फुगणे यांसारख्या समस्या उद्भवतात. दहीमध्ये ऊर्जेचं स्तोत्र मोठ्या प्रमाणात असतं. पण हे पचनासाठी जड मानलं जातं.जर तुम्हाला दही खायचे असेल, तर ते दुपारच्या जेवणात खावं. रात्री दही खाणं टाळावं, कारण यामुळे कफ वाढण्याची शक्यता असते.ताक हे दह्यापासून बनवलं जातं. पण त्यामध्ये पाणी मिसळ्यामुळे आणि घुसळ्यामुळे त्याचे गुणधर्म पूर्णपणे बदलतात. आयुर्वेदात ताकाला मतक्रफ म्हटलं जातं, ज्याची तुलना अमृताशी केली गेली आहे. दह्याच्या विरुद्ध, ताक हे निसर्गात अत्यंत शीत अर्थात थंड असतं. हे शरीराचं तापमान त्वरित कमी करण्यास मदत करतं आणि ताक पचायलाही हलकं असतं. जर तुम्हाला अपचन, गॅस किंवा सिडिटीचा त्रास असेल, तर ताक हे सर्वोत्तम पेय आहे. उन्हाळ्यात शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाईट्स घामाद्वारे बाहेर पडतात. ताक प्यायल्याने शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहते आणि थकवा दूर होण्यास मदत मिळते.उन्हाळ्यात दह्या-पेक्षा ताक पिणं जास्त फायदेशीर ठरतं. दही हे पचायला जड असल्यानं उन्हाळ्यात पचनशक्ती मंदावलेली असताना ताक घेणं अधिक फायदेशीर ठरतं.

# उपदेशकथा: विश्वासाचा सुगंध



चित्तरंजन हे अतिशय हुशार परंतु कट्टर नास्तिक गृहस्थ म्हणून सर्वजण त्यांना ओळखत. म्हणूनच सहदेव महाराजांच्या कीर्तनाला त्यांना आलेले पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. सहदेव महाराज तर धर्माची, ईश्वराच्या अस्तित्वाची महती सांगणारे. आणि अशा धार्मिक विषयाशी संबंधित कार्यक्रमाला चित्तरंजन कसे काय आले ? हे कसे काय शक्य आहे ? म्हणून सर्वत्र मित्र काहीसे अचंबितच झाले. त्यांच्यापैकी एकाला न राहवल्याने त्याने अखेर चित्तरंजन यांना विचारलेच, '' भक्तिमार्गाची प्रवचने, कीर्तने ऐकायला जाणे आपल्याला पटते का ? आपल्या तत्त्वात ते बसते का ? नसेल तर आज येथे येण्याचे कारण काय ?''चित्तरंजन म्हणाले, '' त्याचे असे आहे की, सहदेव महाराज आपल्या प्रवचनात जे सांगतात, त्यावर माझा मुळीच विश्वास नाही. परंतु आपण जे जे बोलतो, त्यावर महाराजांचा दृढ विश्वास आहे. आणि ज्याचा स्वत:च्या बोलण्यावर दृढ विश्वास आहे, अशा व्यक्तीचे बोलणे समजून घ्यायला मला आवडते.''

# कर्करोगाची (Cancer) लक्षणे



शरीरातील प्रभावित अवयवानुसार बदलतात, परंतु सामान्यतः अचानक वजन कमी होणे, सतत थकवा, बरा न होणारा व्रण, शरीरात गाठ येणे आणि भूक मरणे ही सुरुवातीची लक्षणे असू शकतात. ही लक्षणे २ आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.कर्करोगाची प्रमुख लक्षणे:अचानक वजन कमी होणे: कोणतेही कारण नसताना वेगाने वजन कमी होणे हे कर्करोगाचे महत्त्वाचे लक्षण असू शकते.शरीरात गाठ येणे: त्वचेखाली किंवा शरीरात कोठेही गाठ निर्माण होणे जी कठीण असते आणि कालांतराने वाढते. सतत थकवा आणि अशक्तपणा: पुरेसा आराम करूनही खूप थकवा जाणवणे.बरा न होणारा व्रण किंवा जखम: तोंडात, त्वचेवर किंवा शरीराच्या कोणत्याही भागात जखम जी खूप दिवसांनीही भरत नाही.भूकेत बदल: भूक कमी होणे किंवा अन्न पचायला जड जाणे.असामान्य रक्तस्राव: खोकल्यातून रक्त पडणे, लघवी किंवा शौच्यावाटे रक्त पडणे, किंवा मासिक पाळी थांबल्यानंतरही रक्तस्राव होणे.त्वचेतील बदल: त्वचेवर नवीन तीळ किंवा काळे डाग येणे, ज्यांचा आकार, रंग किंवा आकार बदलत असेल. विशिष्ट प्रकारांनुसार लक्षणे:तोंडी कर्करोग: तोंडात पांढरे किंवा लाल डाग, जिभेवर व्रण, हिरड्या जाड होणे, दात सैल पडणे, कानात वेदना होणे.स्तनाचा कर्करोग: स्तनात किंवा काखेत गाठ येणे, त्वचेचा पोत बदलणे.फुफ्फुसाचा कर्करोग: सतत खोकला, श्वास घेण्यास त्रास, छातीत दुखणे.टीप: ही लक्षणे इतर आजारांमुळेही असू शकतात, त्यामुळे केवळ लक्षणांवरून कर्करोगाचे निदान करू नये. त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी (जैसे की बायोप्सी, स्कॅन) करून घ्यावी.

# निवडणुकीनंतरचा जनतेत हिंसाचार



रथ यांच्या हत्येमुळे बंगालमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा ऱ्हास झाला आहे. या हत्येत तृणमूल काँग्रेस पक्षाचा हात नसल्याचे सांगत भाजप या घटनेचे राजकारण करू पाहात असल्याचे आरोप केले आहेत.

पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुकीत परिवर्तन झाले. पंधरा वर्षांची ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसची सत्ता संपुष्टात आली. भाजपने दोनशे सात जागा जिंकल्या. ममता पराभूत झाल्या तरी पराभव मान्य करायला त्या तयार नाहीत. मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला नसला तरी अखेर राज्यपालांनाच मुदतपूर्तीनंतर विधानसभा विसर्जित करावी लागली. त्याबरोबरच ममतांचे मंत्रिमंडळही बरखास्त झाले. तृणमूलच्या पराभवानंतर गेले चार-पाच दिवस तेथे हिंसाचार उफाळून आला आहे. निवडणुकीच्या निकालानंतर झालेल्या हिंसाच-ारात ४ जणांचे बळी गेले आहेत. हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी दोनशेहून अधिक गुन्हे दाखल केले असून, चारशेहून अधिक जणांना अटक केली आहे. शिवाय खबरदारीचा उपाय म्हणून ११०० हून अधिक जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. या हिंसाचाराची निवडणूक आयोगाने दखल घेतली असून, बंगालच्या प्रशासनाला हिंसाचाराबाबत 'झीरो टॉलरन्स' धोरण राबवण्याचे आदेश दिले आहेत. राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केंद्रीय सुरक्षा दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आ-हेत. विधानसभेच्या निवडणुकीत भवानीपूरमध्ये भाजपच्या सुवेंदु अधिकारी यांच्याकडून ममता पराभूत झाल्या. त्या सुवेंदु यांचे स्वीय सचिव असलेल्या चंद्रनाथ रथ यांची चोवीस परगणा जिल्ह्यात रात्रीच्या सुमारास काही हल्लेखोरांनी हत्या केली. सुवेंदु अधिकारी यांनी ही पूर्व नियोजित हत्या असल्याचे म्हटले आहे. ममता पराभूत झाल्याने ही हत्या घडली, असे आरोप भाजपच्या नेत्यांनी केले आहेत. भाजपच्या विजयानंतर अवघ्या दोन दिवसांतच ही हत्या झाल्याने सूडभावनेतून ती झाली असण्याच्या शक्यतेला पुष्टी मिळते. चंद्रनाथ रथ हे सुवेंदु यांचे निकटचे सहकारी होते. त्यांच्यावरील हल्ला म्हणजे तुम्ही जिंकला असाल; पण आम्ही हार मानत नाही, असा संदेश देण्याचा ममता यांचा प्रयत्न असू शकतो.

चंद्रनाथ यांची हत्या एका व्यक्तीची हत्या नसून बंगालमधील सूडाच्या राजकारणाचे प्रतीक आहे. निवडणुकीच्या निकालानंतरचा हिंसाचार बंगालला नवीन नाही. २०२१ च्या निवडणुकीनंतरही असाच हिंसाचार तेथे उसळला होता. विधानसभा विसर्जित गेल्या निवडणुकीचे निकाल २ मे २०२१ रोजी जाहीर झाल्यानंतर लगेचच राज्यभर हिंसा-चार उसळला होता. त्यात वीस-पंचवीस राजकीय कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या होत्या. भाजप बरोबरच तृणमूलचेही काही कार्यकर्ते मारले गेले. घरांची जाळप-ोळ, कार्यालयांची मोडतोड परस्पर विरोधी कार्यकर्त्यांना लक्ष्य करून सूड उगवण्यासारखे प्रकार त्यावेळी घडले होते. ममतांची खेला होबे ही घोषणा खरोखरच खेळ करणारी ठरली. आताही हिंसाचार घडत असताना एकमेकांना लक्ष्य केले जात आहे. निवडणुकीनंतरचा हा हिंसाचार सूड उगवण्यासाठी दहशत पसरवण्यासाठी घडवला जात आहे. साहजिकच सत्तेवर येत असलेल्या भाजपसाठी राज्यात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे मोठे आव्हान असेल. तेथील हिंसाचार थांबवून प्रशासन सुरळीत चालवणे ही भाजपच्या मुख्यमंत्र्यासमोरची पहिली जबाबदारी असेल. ममतांनी निकालावर आक्षेप घेत राजीनामा देण्यास नकार दिल्याने घटनात्मक पेच निर्माण होण्याची शक्यता होती. तथापि मुदत पूर्ण झाल्याने विधानसभा विसर्जित झाली, आता तृणमूल अधिक आक्रमक होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. खरेतर आपली लढाई त्या न्यायालयाच्या मार्फतही लढू शकतात; पण रस्त्यावर उतरून राजकारण करण्यातच ममतांना अधिक स्वारस्य आहे, ही बाब लपून राहिलेली नाही. अर्थात भाजपचे कार्यकर्ते ही कमी नाहीत, याची चुणूक कोलकातामधील न्यू मार्केट परिसरातील दुकानांच्या पाडापाडीतून दिसली. भाजपसाठी निवडणूक जिंकणे पुरेसे नसून, बंगालसारख्या संवेदनशील राज्यात स्थिर सरकार चालवणे, हिंसाचार रोखून जनतेचा विश्वास संपादन करणे ही खरी कसोटी ठरणार आहे. आधीच आक्रमक असलेल्या ममता बॅनर्जी अधिक आक्रमक होणार की इंडिया आघाडी मजबूत करणार हे पाहायचे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



ममुरुमं..फ हा शब्द ऐकल्यावर अनेकांच्या कपाळावर आठ्या येतात. इंटरनेटवर मअॅक्नेफ अर्थात मुरमं, तारुण्यपिटिकांच्या समस्येबद्दलची खरीखोटी माहिती दिलेली असते. जुन्याजाणत्यांच्या अनुभवांपासून ते मैत्रीपूर्ण सल्ल्यांपर्यंत, केमिस्टकडे मिळणाऱ्या औषधांपेक्षा परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या घरगुती उपचारांपासून ते नैसर्गिक उपचारांपर्यंत साऱ्यांचा भडिमार होताना दिसतो. त्यामुळे आपल्या ममुरुमांफ्वरील उपचारांना सुरुवात करण्यापूर्वी या समस्येशी जोडलेल्या गैरसमजांपासून स्वत:ला दूर नेणे आवश्यक आहे.ममुरुमांफ्शी संबंधित काही सर्वसाधारण मिथके आणि या गोष्टी कपोलकल्पित का आहेत, यामागची कारणे पुढीलप्रमाणे -**(क्रमश:)**

## २ Joke विनोद




गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?
शिष्य : असत्यवादी.
गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?
शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.

## ३ Message संदेश



Babu apni girlfriend se- darling kal ghar par aa jana koi bhi nahi hoga!
Jab ladki ghar par aati hai to sachmuch koi nahi tha.
Ladka- kya me tumhara hath tham lu?
Ladki – No thanks ! ye itna bhari nahi he!!

## ४ Thought सुविचार



जागृतावस्थेतील व्याधींना निद्रा हेच एकमेव औषध.
-सर्वेंटिस

**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: ।**
**दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:,**
**प्रवासी नित्यसेवक: ।।**

अर्थ : दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



**आडवे शब्द**

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

**आडवे उत्तर**

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरा-नजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखव-ालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### हार्दिक-सूर्या आरसीबी विरूद्धचा महत्त्वाचा सामना खेळणार की नाही?

मुंबई,–मुंबई इंडियन्सचा संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरूद्ध स्पर्धेच्या दृष्टीने महत्त्वाचा सामना खेळणार आहे. मुंबईचा संघ प्लेऑफमधून लवकर बाहेर होण्याच्या उंबरठ्यावर आहे. यामुळे संघाला उर्वरित चारही सामने जिंकायचे आहेत, त्यापैकी पहिला सामना आरसीबीविरूद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. या सामन्यासाठी हार्दिक पंड्या व सूर्यकुमार यादव हे दोन्ही महत्त्वाचे खेळाडू खेळणार नसल्याची माहिती समोर आली होती, यावर आता मुंबईने मोठी अपडेट दिली आहे. १० मे रोजी रायपूरमध्ये होणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या मकरो या मरोफ सामन्यापूर्वी मुंबई इंडियन्सने कर्णधार हार्दिक पंड्या आणि उपकर्णधार सूर्यकुमार यादव यांच्याबाबत महत्त्वाची अपडेट दिली आहे. सुरुवातीला हे दोन्ही खेळाडू संघासोबत प्रवास करताना दिसले नव्हते. पाठदुखीच्या त्रासामुळे लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या मागील सामन्याला मुकलेला हार्दिक पंड्या संघासोबत नव्हता. तर दुसरीकडे, हंगामी कर्णधार सूर्यकुमार यादव पत्नीसमवेत नुकत्याच जन्मलेल्या मुलीच्या स्वागतासाठी मुंबईतच थांबला होता.

### आयपीएल इतिहासातली सगळ्यात मोठी ओव्हर, आर्चरच्या नावावर कलंक!

जयपूर–आयपीएल २०२६ मध्ये गुजरातविरुद्धच्या सामन्यात राजस्थानचा फास्ट बॉलर जोफ्रा आर्चरने लाजिरवाणा इतिहास घडवला आहे. जोफ्रा आर्चरने आयपीएलच्या इतिहासातली सगळ्यात मोठी ओव्हर टाकली आहे. या सामन्यात राजस्थानचा कर्णधार यशस्वी जयस्वालने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला, यानंतर मॅचच्या पहिल्याच ओव्हरमध्ये जोफ्रा आर्चरने आयपीएलच्या १९ वर्षांमधली सगळ्यात मोठी ओव्हर टाकली.जोफ्रा आर्चरने त्याच्या पहिल्याच ओव्हरमध्ये चार वाईड आणि एक नो बॉल टाकला, यातल्या एका वाईडला तर फोर गेल्यामुळे गुजरातला ५ रन मिळाल्या, पहिल्याच ओव्हरमध्ये जोफ्रा आर्चरने तब्बल १८ रन दिले. जोफ्रा आर्चरच्या पहिल्याच बॉलला साई सुदर्शनने फोर मारली, त्यानंतर आर्चरने दुसरा बॉल वाईड टाकला, यानंतर पुढच्या बॉलला सुदर्शनने एकही रन काढली नाही. आर्चरने मग नो बॉल, वाईडवर फोर, वाईड, वाईड, शून्य रन, एक रन, दोन रन आणि १ रन दिली. जोफ्रा आर्चरची ही पहिलीच ओव्हर तब्बल ११ बॉलची होती. आयपीएलच्या १९ वर्षांमध्ये ११ बॉलची ओव्हर टाकणारा जोफ्रा आर्चर पहिलाच परदेशी खेळाडू आहे.

### कितीही सिक्स मारा, विकेट घ्या... फॉलोअर्स ठरवणार खेळाडूची किंमत, टी२० लीगने बदलली लिलावाची पद्धत!

मुंबई–जगातली सगळ्यात मोठी क्रिकेट लीग असलेल्या आयपीएलमध्ये खेळाडूंवर कोट्यवधींची बोली लागते. फक्त दोन महिने आयपीएल खेळाडू फक्त भारतीयच नाही तर परदेशी खेळाडूही करोडपती होतात. जगभरातल्या सगळ्या टी–२० लीगमध्ये आयपीएल वेगळी असण्याचं कारण म्हणजे खेळाडूंवर लागणारी बोली, पण आता टी–२० क्रिकेटमध्ये खेळाडू विकत घेण्यासाठी भलतीच पद्धत अवलंबली जाणार आहे.सध्याच्या क्रिकेटमध्ये खेळाडूंची ब्रॅण्ड व्हॅल्यू किती महत्त्वाची आहे, याचं उदाहरण समोर आलं आहे. लंका प्रीमियर लीगने त्यांच्या सहाव्या मोसमासाठी नवे नियम लागू केले आहेत, त्यामुळे आता खेळाडूंना फक्त त्यांच्या कामगिरीमुळे जास्त पैसे मिळणार नाहीत.
एलपीएलचे स्वत:चे फॉलोअर्सच कमी
एलपीएलने खेळाडूंच्या फॉलोअर्सबद्दल नियम बनवला असला तरी त्यांचं स्वत:चं सोशल मीडिया अकाऊंट २०२४ नंतर फारसे ॲक्टिव्ह नाही.

### भारतीय महिला तिरंदाजांनी पहिले पदक पटकावले

नवी दिल्ली : भारतीय महिला रिकर्व्ह संघाने विश्वचषक स्टेज २ मध्ये तिरंदाजीतील पहिले पदक पटकावले आहे. तिरंदाजीमध्ये, भारतीय महिला रिकर्व्ह संघाने आज चीनमधील शांघाय येथे झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात विक्रमी १० वेळा ऑलिम्पिक चॅम्पियन राहिलेल्या दक्षिण कोरियावर शानदार विजय मिळवून विश्वचषक स्टेज २ मधील देशाचे पहिले पदक निश्चित केले. अनुभवी दीपिका कुमारी, अंकिता भाकत आणि किशोरवयीन कुमकुम मोहोड यांच्या महिला संघाने दक्षिण कोरियाच्या संघाला ५–१ ने पराभूत करून रविवारी दुसर्या मानांकित चीनविरुद्ध सुवर्णपदकासाठीचा सामना निश्चित केला आहे. मात्र, अनुभवी तरुणदीप राय, धीरज बोम्मादेवरा आणि यशदीप भोगे यांच्या भारतीय पुरुष संघाला बांगलादेशविरुद्ध २–६ असा धक्कादायक पराभव पत्करावा लागला.



# गुजरातचा राजस्थानवर दणदणीत विजय

## शुबमन गिलचा संघ प्लेऑफपासून फक्त १ पाऊल दूर; रशीदची फिरकी ठरली गेमचेंजर

**नवी दिल्ली:**गुजरात टायटन्सने राजस्थान रॉयल्सचा मोठा पराभव करत गुजरातचा संघ थेट गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे.
गुजरात टायटन्सनने राजस्थान रॉयल्सला १५२ धावांवर सर्वबाद करत ७७ धावांनी दणदणीत विजय नोंदवला आहे. या विजयासह गुजरातने गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी उडी घेतली आहे. तर राजस्थानचा संघ टॉप–४ मधून बाहेर पडला आहे. राशीद खान व जेसन होल्डरच्या गोलंदाजीच्या बळावर गुजरातने राजस्थानचा सहज पराभव केला. गुजरात टायटन्सनने प्रथम फलंदाजी करताना गिल आणि सुदर्शनच्या भागीदारीच्या बळावर २० षटकांत २२९ धावांचा डोंगर उभारला. तर प्रत्युत्तरात राजस्थानच संघ १६.३ षटकांत अवघ्या १५२ धावा करत सर्वबाद झाला. मधल्या षटकांमध्ये रशीद खानच्या फिरकीने सामना गुजरातच्या बाजूने वळवला.
गुजरात टायटन्सने दिलेल्या २२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाह करताना राजस्थानला वैभव सूर्यवंशीने चांगली सुरूवात करून दिली होती. पण सिराजने वैभवला बाद केल्यानंतर राजस्थानच्या फलंदाजीला सुरूंग लागला. सूर्यवंशी १६ चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह ३६ धावा करत बाद झाला. तर कर्णधार असलेला यशस्वी जैस्वाल ३ धावा करत बाद झाला. ध्रुव जुरेलने १० चेंडूत २४ धावा कुटल्या, पण रशीदच्या गोलंदाजीवर तो बाद







झाला. हेटमायर फक्त ६ धावांचं योगदान देण्यात यशस्वी ठरला.
घइउचा पहिला करोडपती आहे 'या' मराठी अभिनेत्रीचा नवरा! 'कमळी' मालिकेत साकारतेय भूमिका; म्हणाल्या, ङ्गविजेत्याची बायकोःङ्घ
अहिल्यानगर पोलिसांच्या कार्यपद्धतीबद्दल पालकमंत्री विखे यांची तीव्र नाराजी; ग्राम सुरक्षा दल स्थापन करण्याचे निर्देश
२२ व्या वर्षी प्रेमात पडली होती ज्ञानदा! दोघांच्या वयात आहे कामगिरी करणारा ठरला जगातील पहिलाच फलंदाज
रवींद्र जडेजाने ३८ धावा करत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण त्याला समोरून अपेक्षित साथ नाही मिळाली. शुभम दुबेने १५ धावा तर दासुन शनाकाने १६ धावांचं योगदान दिलं. रशीद खानने मधल्या षटकांमध्ये ४ विकेट्स घेत राजस्थानच्या फलंदाजांना झटपट माघारी धाडलं. रशीदने ध्रुव जुरेल, डोनावन फरेरा, शुभम दुबे या फलंदाजांना क्लीन बोल्ड केलं तर राजस्थानचा डाव सावरणाऱ्या जडेजाला पायचीत करत गुजरातला महत्त्वाची विकेट मिळवून दिली. रशीदशिवाय जेसन होल्डरने ३ विकेट्स घेतल्या, तर कगिसो रबाडाने २ तर सिराजने १ विकेट घेतली. राजस्थानने नाणेफेक जिंकत गुजरातला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. गुजरातसाठी हा निर्णय एकदम योग्य ठरला आणि संघाने दणक्यात सुरूवात केली. साई सुदर्शन व शुबमन गिल या जोडीने पहिल्या विकेटसाठी ६५ चेंडूत ११८ धावांची भागीदारी रचली. तर साई सुदर्शन ३६ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांसह ५५ धावा करत बाद झाला. तर शुबमन गिलने ४४ चेंडूत ९ चौकार व ३ षटकारांसह ८४ धावांचं योगदान दिलं. जोस बटलर १३ धावा, तर जेसन होल्डर ७ व राहुल तेवतिया १४ धावा करत बाद झाले. याशिवाय वॉशिंग्टन सुंदरने २० चेंडूत २ चौकार व ३ षटकारांसह नाबाद ३७ धावांचं योगदान दिलं. यासह गुजरातचा संघ प्रथम फलंदाजी करताना २२९ धावा करू शकला.
राजस्थानकडून बृजेश शर्माने सर्वाधिक २ विकेट्स तर यश राज पुंजा व रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या. राजस्थान रॉयल्सच्या प्लेऑफच्या आशांना या पराभवामुळे मोठा धक्का बसला आहे. आता त्यांना उर्वरित ३ सामन्यांपैकी २ सामने जिंकायचे आहेत.



# रोहित शर्मा पुन्हा होणार मुंबई इंडियन्सचा कॅप्टन?

मुंबई–मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात आयपीएल २०२६ चा ५४ वा लीग सामना रविवार १० मे रोजी पार पडणार आहे. हा सामना मुंबई इंडियन्ससाठी प्लेऑफमध्ये स्थान मिळवण्याकरता अत्यंत महत्वाचा असणार आहे. त्यामुळे या करो वा मरो सामन्यात मुंबई इंडियन्सचं नेतृत्व कोण करणार याबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. मुंबई इंडियन्सचा नियमित कर्णधार हार्दिक पंड्या याची तब्येत ठीक नसल्याने तो लखनऊ विरुद्ध झालेल्या मागच्या सामन्यात खेळला नव्हता. त्यामुळे सूर्यकुमार यादवकडे संघाचं नेतृत्व सोपवण्यात आलं होतं. मात्र आरसीबी विरुद्ध सामन्यापूर्वी सूर्याच्या घरी नव्या चिमुकलीचं आगमन झालं आहे. त्यामुळे सूर्यकुमार हा आरसीबी विरुद्ध सामन्यात संघाचा भाग नसेल आणि कुटुंबासोबत वेळ घालवेल अशी शक्यता होती. ज्यामुळे हार्दिक आणि सूर्यकुमारच्या अनुपस्थितीत रोहित शर्माकडे आरसीबी विरुद्ध सामन्यात मुंबई इंडियन्सचं कर्णधारपद सोपवलं जाऊ शकतं अशी शक्यता वर्तवली जात होती, मात्र मुंबई इंडियन्सने शनिवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत याबाबत खुलासा केला आहे. ज्यानुसार सूर्यकुमार यादव हा रविवारी रायपूरला दाखल होणार असून तो संध्याकाळी मैदानात खेळण्यासाठी उतरेल. शनिवारी रायपूरमध्ये मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू सामन्यापूर्वी होणारी पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेच्या सुरुवातीलाच मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्या आणि सूर्यकुमार यादवबाबत महत्वाची अपडेट दिली. त्यांनी सांगितलं की सूर्यकुमार यादव हा रायपूरमध्ये संघासोबत दाखल झाला आहे. मात्र तो सामना खेळण्यासाठी पूर्णपणे फिट आहे की नाही याबाबत मेडिकल टीम आम्हाला माहिती देईल, त्यानंतरच सामन्यात तो खेळणार की नाही हे ठरेल. तसेच सूर्यकुमार यादव हा बाबा झाला असून त्याच्या घरी चिमुकलीचं आगमन झाल्याने मागील काही दिवस त्याच्या कुटुंबासोबत होता. सूर्यकुमार यादव रविवारी सकाळी रायपूरला येणार असून तो मुंबई इंडियन्सचा संघ जॉईन करेल अशी माहिती मुंबई इंडियन्सने दिली.
मुंबई विरुद्ध आरसीबी यांच्यात रविवारी होणाऱ्या महत्वाच्या सामन्यात मुंबई इंडियन्सचं नेतृत्व कोण करेल याबाबत अधिकृत माहिती मिळालेली नाही. मात्र अजूनही नियमित कर्णधार हार्दिक पंड्या हा पूर्णपणे बरा झालेला नाहीये. रविवारी सामन्यापूर्वी मेडिकल टीमने त्याच्या फिटनेसबाबत ग्रीन सिग्नल दिला, तरच तो सामन्यात संघाचं नेतृत्व करेल आणि प्लेईंग ११ मध्ये खेळेल. मात्र जर तसं झालं नाही तर मात्र हार्दिक ऐवजी पुन्हा सूर्यकुमार यादवकडेच संघाचं नेतृत्व सोपवलं जाईल. लखनऊ सुपर जाएंट्स विरुद्ध ४ मे रोजी झालेल्या सामन्यात सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सने विजय मिळवला होता. त्यामुळे हा विजय कायम ठेवण्याचा प्रयत्न मुंबईचा संघ करेल. त्यामुळे रोहित शर्मा हा मुंबई इंडियन्सचं नेतृत्व करणार नाही हे जवळपास निश्चित आहे.

# अक्षर पटेलमुळे दिल्लीचे १३.२५ कोटींचे नुकसान? कर्णधारावर गंभीर आरोप, चुकीच्या पद्धतीने...



दिल्ली–आयपीएलचा हंगाम आता अखेरच्या टप्प्याकडे जात असताना, दिल्ली कॅपिटल्स संघासमोर अनेक चिंता आहेत. फिरकी गोलंदाज कुलदीप यादवचा सध्याचा फॉर्म हा संघासाठी सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. १३.२५ कोटींना रिटेन करण्यात आलेल्या कुलदीपने १० सामन्यांमध्ये केवळ ७ विकेट घेतले आहेत. या हंगामात त्याने १० पेक्षा अधिकच्या मइकॉनॉमी रेटफ्ने धावा दिल्या आहेत. अनेकदा तर त्याने आपल्या गोलंदाजीचा संपूर्ण कोटाही पूर्ण केलेला नाही. भारताचा आणि चेन्नई सुपर किंग्जचा (ण्एख) माजी स्टार खेळाडू सुब्रमण्यम बद्रीनाथ याने कुलदीपचा योग्य वापर न केल्याबद्दल दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेल याला जबाबदार धरलं आहे.
मफ्कुलदीप यादव चांगली गोलंदाजी केलेली नाही हे नक्की आहे. अक्षर पटेलने त्याचा योग्य वापर केला नाही,फ्र असं बद्रीनाथने म्हटलं आहे. आपल्या युट्यूब चॅनेलवर बोलताना त्याने हे मत मांडलं. कुलदीपच्या खराब कामगिरीची जबाबदारी जितकी स्वत: कुलदीपची आहे, तितकीच ती अक्षर पटेलवचीही आहे.
मफ्गोलंदाजाचा वापर तुम्ही नेमक्या कोणत्या वेळी करता, हे अत्यंत महत्त्वाचं असतं. एकदा अक्षरने कुलदीपला २० वी ओव्हर टाकायला लावली होती, तर स्वत: मात्र त्याने गोलंदाजी केली नाही. तुम्ही तुमच्या गोलंदाजाला अशा कठीण परिस्थितीत टाकू शकत नाही,फ्र असे मत त्याने मांडले.
मफ्कर्णधाराने योग्य वापर केलेला नाही आणि कुलदीपने त्याची सर्वोत्तम खेळी केलेली नाही. जेव्हा एखादा प्रमुख गोलंदाज फॉर्ममध्ये नसतो, तेव्हा कर्णधाराने त्याचा योग्य वेळी वापर करणं हे अधिकच महत्त्वाचं ठरतं. त्यामुळे हे दोन्ही बाजून आहे. शिवाय, अक्षरची कामगिरी–ही सध्या सर्वोत्तम पातळीवर नाही,फ्र असं त्याने पुढे नमूद केलं. दरम्यान, कोलकाता नाईट रायडर्स विरुद्धच्या सामन्यापूर्वी, दिल्ली कॅपिटल्सचा फलंदाज डेव्हिड मिलरने खराब फॉर्मचा सामना करणाऱ्या कुलदीप यादवला पाठिंबा दिला. तो कौशल्यवान खेळाडू आणि सामना जिंकून देणारा आहे असं त्याने म्हटलं. घरच्या मैदानावर सलग चार पराभवांचा सामना केल्यानंतर दिल्ली स्पर्धेत आव्हान टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष कर आहेत. आयपीएलच्या या हंगामात कुलदीपची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. त्याने १० सामन्यांत केवळ सात बळी मिळवले असून, त्याची सरासरी ४४.४२ आणि इकॉनॉमी रेट १०.३६ इतका राहिला आहे. ३१ धावांत २ विकेट्स ही त्याची सर्वो

# बाबर आझम पाकिस्तान संघातून कायमचा बाहेर?



कराची : बाबर आझम हा पाकिस्तानचा सर्वात अनुभवी फलंदाज आहे. पीएसएलमध्ये आपल्या नेतृत्वाखाली चॅम्पियन बनवणारा हा खेळाडू फॉर्मात पण आहे. दरम्यान, बाबर आझमसोबत नेमकं काय घडले. याबाबत आता पाकिस्तान क्रिकेटमध्ये मोठी चर्चा रंगू लागली आहे. दुखापतीचं कारण देत त्याला प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर ठेवण्यात आलं, पण आता तो पूर्णपणे फिट असल्याच्या चर्चांनी सोशल मीडियावर खळबळ उडवली आहे. त्यामुळे बाबरलाही या निर्णयामुळे नाराजी असल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, पाकिस्तान संघाने बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीत दोन नव्या खेळाडूंना संधी दिली आहे. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

## फेडरेशन चषक — भारतीय कुस्ती महासंघाकडून निवड चाचणी निकषात बदल

# आशियाई क्रीडा स्पर्धेस विनेश फोगट मुकणार

निवृत्ती मागे घेऊन मॅटवर परतलेल्या विनेशने वरिष्ठ राष्ट्रीय किंवा फेडरेशन चषक स्पर्धेत सहभाग न घेतल्याने नव्या तांत्रिक नियमांनुसार ती आशियाई स्पर्धेसाठी अपात्र ठरली आहे.
आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरण्यात विनेश फोगटला अडथळा (छायाचित्र – लोकसत्ता टीम)
पुणे : निवृत्तीचा निर्णय मागे घेत तब्बल २० महिन्यांनी कुस्तीच्या मॅटवर पुनरागमन करणार्या विनेश फोगटचे आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळण्याचे स्वप्न अधुरेच राहणार आहे. भारतीय कुस्ती महासंघाने (डब्ल्यूएफआय) आपल्या निवड चाचणीतच बदल केल्यामुळे विनेश आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळू शकणार नाही.
शिवाय २३ वर्षांखालील गटातील कुस्तीगिरांनाही चाचणीत भाग घेणे अवघड जाणार आहे.
'डब्ल्यूएफआय'ने १० ते १२ मे दरम्यान गोंडा येथे राष्ट्रीय मानांकन कुस्ती स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेतील पदकविजेत्यांचा आशियाई पात्रता स्पर्धेसाठी विचार केला जाणार होता. मात्र, आता 'डब्ल्यूएफआय'ने आशियाई स्पर्धेसाठी पात्रता निकषातच बदल केल्यामुळे या स्पर्धेच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.
विशेष म्हणजे या स्पर्धेसाठी प्रवास, निवास, भोजन असा सर्व खर्च सहभागी मल्लांनाच करायचा आहे. महासंघाने केवळ या सर्व संलग्न संघटनांना तेथील उपलब्ध धर्मशाळांच्या नावांची यादी पाठवली आहे. जागेच्या उपलब्धतेनुसार सर्व मल्लांना नोंदणी प्रक्रिया पूर्ण करायची असल्याचे समजते.
उत्तेजक सेवन प्रतिबंध संस्थेची प्रक्रिया देखील विनेशने पार पाडली. तिचा मानांकन स्पर्धेत खेळण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, निकषच बदलल्यामुळे विनेश आता आशियाई स्पर्धेत खेळू शकणार नाही. परंतु ती पुन्हा एकदा जागतिक स्पर्धेचे ध्येय बाळगू शकते.

**निकषात काय बदल?**

गोंडा येथील राष्ट्रीय मानांकन कुस्ती स्पर्धेतील पदकविजेत्यांचा आशियाई पात्रता स्पर्धेसाठी विचार केला जाणार होता. मात्र, आता पात्रता निकष बदलण्यात आला आहे. बदलत्या निकषानुसार, आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवडी चाचणीसाठी आता वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा (१२ ते १४ डिसेंबर २०२५), वरिष्ठ फेडरेशन स्पर्धा (१२ ते १४ फेब्रुवारी २०२६) आणि २० वर्षांखालील राष्ट्रीय स्पर्धा (१० ते १२ एप्रिल २०२६) यातील पदकविजेत्यांनाच पात्र धरले जाईल. विनेश यापैकी एकाही स्पर्धेत सहभागी झाली नाही. त्यामुळेच विनेश आशियाई स्पर्धेत खेळू शकणार नाही.



**२३ वर्षांखालील गटाची अडचण**

आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीची निवड चाचणी ३० आणि ३१ मे रोजी होणार आहे. मात्र, २३ वर्षांखालील गटातील मल्लांना या चाचणीत खेळणे अवघड जाऊ शकते. व्हिएतनाम येथे नियोजित २३ वर्षांखालील आशियाई स्पर्धा २६ तारखेस संपणार आहे. त्यानंतर चारच दिवसांत भारतात येऊन चाचणीत सहभागी होणे युवा मल्लांसाठी आव्हानात्मक ठरेल. महासंघाने जे मल्ल २३ वर्षांखालील स्पर्धेतून माघार घेतील, त्यांना आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पात्रता फेरीसाठी प्रवेश मिळणार नाही अशी सक्तीची अट घातली आहे.
आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवडीसाठी गोंडा येथे राष्ट्रीय मानांकन स्पर्धेतील कामगिरी ग्राह्य धरली जाणार नाही. परंतु मानांकन स्पर्धेतील पदकविजेत्यांचा आगामी जागतिक आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी विचार केला जाईल. – 'डब्ल्यूएफआय' अधिकारी.

# महाराष्ट्र दहावी बोर्ड निकाल २०२६ मध्ये फिजिक्सवालाच्या सात विद्यार्थ्यांना ५०० पैकी ५०० गुण

**लातूर /प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेच्या निकालात फिजिक्सवालाच्या PW Udaan 2026 (Class 10th) Maharashtra Batch मधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत फिजिक्सवालाच्या सात विद्यार्थ्यांनी ५०० पैकी ५०० गुण मिळवत घवघवीत यश मिळवले आहे.

५०० पैकी ५०० गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अर्पिता दत्ता वाडकर (लातूर), ओमकार कल्याण राठोड (लातूर), मृण्मयी संतोष वाईकर (छत्रपती संभाजीनगर), रुद्र अभय उत्पात (पुणे), शिवम दत्तात्रय चाटे (लातूर), स्नेहा चक्रधर करभारी (लातूर) आणि सूरज अंकुश बाडे (छत्रपती संभाजीनगर) यांचा समावेश आहे.




याशिवाय, २५ हून अधिक विद्यार्थ्यांनी ९९ टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळवले, तर ५५ हून अधिक विद्यार्थ्यांनी ९८ टक्के व त्यापेक्षा अधिक, ९८ हून अधिक विद्यार्थ्यांनी ९७ टक्के व त्यापेक्षा अधिक, १५६ हून अधिक विद्यार्थ्यांनी ९६ टक्के व त्यापेक्षा अधिक, तसेच २५४ हून अधिक विद्यार्थ्यांनी ९५ टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. तब्बल ९३६ हून अधिक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

या निकालात २७ विद्यार्थ्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले, तर ९ विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयात पूर्ण गुण मिळवले आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना फिजिक्सवालाचे संस्थापक व शिक्षक अलख पांडेय म्हणाले, महाराष्ट्र बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचा आम्हाला अभिमान आहे. हे यश विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. फिजिक्सवालामध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार व सुलभ शिक्षण उपलब्ध करून देण्यावर आमचा भर कायम राहील.

फिजिक्सवाला महाराष्ट्र बोर्डाच्या विद्यार्थ्यांना लाईव्ह क्लासेस, प्रॅक्टिस मॉड्यूल्स, डाऊट सॉल्व्हिंग सपोर्ट आणि बोर्ड परीक्षेसाठी अभ्यासक्रमाधारित मार्गदर्शनाच्या माध्यमातून सातत्याने मदत करत आहे.

# माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी घेतल्या नागरिकांच्या भेटी



**लातूर/प्रतिनिधी :** शनिवार दि. ९ मे २०२६ राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ९ मे रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, नागरिक यांच्या भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला. तसेच त्यांच्या अडीअडचणी, समस्या जाणून घेऊन त्यांची निवेदने व निमंत्रनाचा स्वीकार करीत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधितांना सूचना केल्या. यावेळी श्रीशैल उटगे, सई ताई गोरे, ट्वेन्टी वन शुगर्स व्हा. चेअरमन विजय देशमुख, विजयकुमार साबदे, ड.किरण जाधव, सुनील बसपुरे, ड.समद पटेल, प्रा.सुधीर अनवले, संतोष देशमुख, प्रकाश मिरगे, शिवम उटगे, उपसरपंच गोविंद देशमुख, पृथ्वीराज देशमुख, भुषण पाटील, प्रदीप तीकटे, अमोल धावणे, उमेद अभियानाच्या सीमा कांबळे, सुभद्रा काकडे, मीनाक्षी चाबुकस्वार, सावित्री बोयने, कलावती अवघडे, सायरा पठाण, शोभा ओहोळ, अनिता कांबळे, विजय धुमाळ, विजय गायकवाड, रामदास पवार, चांददपाशा इनामदार, प्रा.भालचंद्र येडवे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, संस्था संघटना पदाधिकारी, सदस्य, नागरिक उपस्थित होते.

## सलग दुसऱ्या दिवशीही अतिक्रमण हटाव सुरुच; गोलाई परिसरातील ग्रीन बेल्ट केला खुला



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने गुरुवारी (दि. ७ ) सुरू करण्यात आलेली अतिक्रमण हटाव मोहीम शुक्रवारी दुसऱ्या दिवशीही सुरूच होती. शुक्रवारी गोलाई परिसरातील ग्रीन बेल्टही खुला करण्यात आला.

मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या निर्देशानुसार उपायुक्त वसुधा फड यांनी अतिक्रमण हटाव मोहिमेचे नियोजन केले आहे. गुरुवारी गोलाई परिसरातील जवळपास ३०० अतिक्रमणे हटविण्यात आली होती.शुक्रवारी लोखंड गल्ली,मलंग गल्ली, गंजगोलाईतील ग्रीन बेल्ट, मुख्य रस्ता तसेच आजूबाजूच्या परिसरातील अतिक्रमणावर मनपाने हातोडा मारला.यामुळे गजबजलेल्या गंजगोलाईतील रस्ते मोकळे झाले.अतिक्रमणे हटल्यामुळे पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागा उपलब्ध झाली.

अतिक्रमणे हटविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालये आणि अतिक्रमण हटाव विभागाची एकूण पाच पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांनी दुसऱ्या दिवशीही सकाळपासूनच धडाकेबाज कारवाई करत अतिक्रमणे काढली.

अतिक्रमण हटाव मोहीम यापुढेही सुरूच राहणार आहे. व्यापारी व व्यावसायिकांनी अतिक्रमणे करू नयेत.यापुढे अतिक्रमणे करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

दरम्यान अतिक्रमण हटाव मोहिमेचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. अतिक्रमणे काढल्यामुळे रस्त्यांची मूळ रुंदी स्पष्टपणे दिसून येत आहे. अतिक्रमणे काढली तर वाहतूक कोंडीची समस्याही दूर होणार आहे, अशा प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त केल्या जात आहेत.

## भारत माध्यमिक विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा ८१.२५% निकाल

**लातूर/प्रतिनिधी :** लेबर कॉलनी येथील भारत माध्यमिक विद्यालयाचा फेब्रुवारी- मार्च मध्ये झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ८१.२५% एवढा लागला आहे. इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा शुक्रवार दिनांक ८ मे २०२६ रोजी निकाल जाहीर झाला आहे भारत माध्यमिक या विद्यालयाचे विद्यार्थी प्रतीक्षा गोविंद सावळे प्रथम, स्वाती महादू कांबळे द्वितीय तर आत्तार आलिशा अकबर तिसरी आली. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बी.के. सूर्यवंशी, सचिव एल इ भागवत, मुख्याध्यापक सी. के. कुरूम यांनी पुष्पहार देऊन कौतुक केले. दहावी परीक्षेतील शाळेच्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यां च्या सत्कार प्रसंगी आर. जी.पवार, आर.जी.कांबळे, गीता होमकर मॅडम,पल्लवी सांडूर मॅडम, भस्मे सर तसेच पालक उपस्थित होते.

# आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत खरीप पूर्वतयारीचा व्यापक आढावा; शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन

**औसा/प्रतिनिधी :** यंदा अत्यल्प पावसाची शक्यता लक्षात घेता खरीप हंगामासाठी प्रशासनाने आणि शेतकऱ्यांनी अधिक सजग राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले. प्रशासकीय इमारतीत आयोजित खरीप पूर्व हंगाम आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, कृषी सहाय्यक तसेच तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय हाके, जिल्हा व्यवस्थापक (महाबीज, लातूर) राजीव माने, सदाशिव जोगदंड यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत खरीप हंगामासाठी आवश्यक बियाणे, खते, कीटकनाशके, वीजपुरवठा व सिंचन व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांना वेळेत दर्जेदार बियाणे व खते उपलब्ध व्हावीत, कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये यासाठी संबंधित विभागांनी काटेकोर दक्षता घ्यावी, अशा स्पष्ट सूचना आमदार अभिमन्यू पवार यांनी दिल्या. खत व बियाण्यांचा तुटवडा भासू नये म्हणून सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.हवामान खात्याच्या अंदाजानुसार कमी पावसाची शक्यता असल्याने पारंपरिक शेतीऐवजी ठिबक सिंचनासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. पाणी वाचवा, उत्पादन वाढवा या संकल्पनेवर भर देत कमी पाण्यात अधिक उत्पादन मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे, असे आमदार पवार यांनी स्पष्ट केले.




कृषी विभागामार्फत हंगामपूर्व शेतकरी प्रशिक्षण मोहिम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यात बियाणे उगवणक्षमता तपासणी, बीजप्रक्रिया, बीबीएफ व टोकण पद्धतीने सोयाबीन लागवड, गोगलगायी नियंत्रण, येलो मोझाईक व तूर पिकातील मर रोग नियंत्रण, नॅनो युरिया व नॅनो डीएपीचा वापर, तसेच फळबाग लागवड यावर मार्गदर्शन केले जाणार आहे.

प्रत्येक गावात किमान तीन प्रशिक्षण बैठका घेण्याचे, तसेच व्हॉट्सअॅप ग्रुप व डिजिटल शेतीशाळांद्वारे शेतकऱ्यांपर्यंत तांत्रिक माहिती पोहोचविण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच पीएम किसान योजनेपासून वंचित शेतकऱ्यांचा लाभ सुनिश्चित करण्याबाबतही कृषी विभागाने कार्यवाही करावी, असे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

पेरणीस घाई न करता योग्य पावसाच्या प्रतीक्षेनंतरच पेरणी करावी, आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा आणि जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सूचित केले. शेतकरी हा देशाचा कणा असून प्रशासन व कृषी विभागाने समन्वयाने काम करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या बैठकीमुळे खरीप हंगामाच्या पूर्वतयारीला गती मिळणार असून शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

# लातूर बाजार समितीत अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करा; आ.अमित देशमुख यांचे निर्देश

### नव्या मार्केट यार्डच्या उभारणी बाबत आढावा बैठक





**लातूर/प्रतिनिधी :** शनिवार दि. ०९ मे २०२६ बदलत्या काळाच्या गरजा ओळखून नवीन मार्केट यार्डमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेतील शेतीमालाचे भाव कळण्यासाठी आणि निर्यातक्षम शेतीमाल उत्पादनासाठी योग्य मार्गदर्शन मिळेल, अशा सुविधा या ठिकाणी उभाराव्यात, असे निर्देश माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिले. लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती संचालकांची बाजार समिती सभागृहात माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ९ मे रोजी बाजार समिती संचालकांसमवेत बाजारसमिती कामकाज आढावा बैठक घेतली. बाजार समितीच्या वतीने शेतकरी, तसेच व्यापारी, आडते, मुनीम, हमाल, मापाडी, गाडीवान, मजूर यांच्यासाठी राबवायच्या योजना व मार्केट यार्ड परिसरात उभाराव्याच्या सुविधा संदर्भात यावेळी विस्तृतपणे चर्चा केली. प्रारंभी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी बाजार समिती संचालकाच्या समवेत लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली आणि त्यानंतर बाजार समिती इमारत पाहणी केली.

या बैठकीत माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी लातूर एमआयडीसी परिसरात नव्याने उभारावयाच्या अद्यावत मार्केट यार्ड संदर्भात यावेळी विस्तृत चर्चा झाली, मार्केट यार्ड उभारणीसाठी मुदतवाढ घेऊन त्या ठराविक मुदतीत सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना याप्रसंगी त्यांनी दिल्या आहेत. यावेळी बोलतांना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले, बदलत्या काळाच्या गरजा लक्षात घेऊन नव्याने उपलब्ध होत असलेले अद्यावत तंत्रज्ञानाचा या मार्केट यार्ड मध्ये करण्यात यावा, व्यापाऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन गाड्यांची उभारणी करावी, सेल हॉल बांधावेत, जगभरातील शेतीमालाचे भाव या ठिकाणी शेतकऱ्यांना कळावेत, जागतिक मागणी लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी कोणती पिके घ्यावीत आणि निर्यात योग्य शेतीमाल बाजारात आणण्यासाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्याच्या सुविधा या ठिकाणी उभारण्यात याव्यात आदिसुचना याप्रसंगी देण्यात आल्या आहेत. दरम्यान माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी यावेळी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती मधील व्यापारी बांधवाशी देखील संवाद साधला.

यावेळी बाजार समिती सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडिले, ललित भाई शहा, ड. किरण जाधव, ड. समद पटेल, विजय देशमुख, बालाजी वाघमारे, मयूर चित्ते,अनिल पाटील, सचिन सूर्यवंशी, बालाप्रसाद बिदादा,अनंत पवार, शिवाजी कांबळे, आर्किटेक्ट सिद्दिकी, कंत्राटदार दिलीप माने, अजय गंभीरे यांच्यासह लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती पदाधिकार, सदस्य, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## सिध्दिविनायक सोसायटीतर्फे स्नेहल ज्ञानोबा गायकवाड यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील कन्हेरी चौक, रिंग रोड भागातील सिध्दिविनायक हौसिंग सोसायटी येथील रहिवासी स्नेहल ज्ञानोबा गायकवाड या विद्यार्थिनीने इयत्ता १० च्या परीक्षेत ९९.६० टक्के गुण घेऊन देदिप्यमान यश मिळवले तर पोदार सीबीएसई इंग्लिश स्कूलची विद्यार्थीनी अनामिका मनोज शिंदे या विद्यार्थीनीने ७७ टक्के गुण घेऊन यश मिळवलेले आहे. त्यामुळे सिध्दिविनायक सोसायटीच्यावतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात यशवंत विद्यालयाच्या सहशिक्षिका मनिषा पवार व सिध्दिविनायक हौसिंग सोसायटीचे अध्यक्ष एम.एपी.गायकवाड यांच्याहस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन स्नेहल गायकवाड व अनामिका मनोज शिंदे या विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सिध्दिविनायक सोसायटीचे संचालक विनोद शिंदे, मनोज शिंदे, विजय जोशी, दिनकर सावळसुरे, राजाभाऊ भोईभार यांच्यासह सिध्दिविनायक हौसिंग सोसायटीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिण्याच्या पाण्यात आढळला मृत बेडूक

**नांदेड/प्रतिनिधी :** नवीन नांदेड शहरातील ग्रामीण पॉलिटेक्निक कॉलेजमधील पिण्याच्या पाण्यात मृत आणि जिवंत बेंडूक आढळून आले आहेत. या कॉजेलमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पिण्याच्या पाण्यात मृत बेंडूक सापडल्याने विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांनी याचे व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारित केले आहेत. दूषित पाणी पिल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. विशेष म्हणजे यापूर्वीही अशा अनेक घटनांच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या आहेत.

# खरोळा येथे महिला बचत भवन सभागृहाचे लोकार्पण; महिलांच्या सक्षमीकरणासाठी कायम प्रयत्नशील: धिरज देशमुख

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील खरोळा येथे तीर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत श्री दत्त मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या सभागृह व ध्यान मंदिराची पाहणी करून लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी पाहणी केली. तसेच खासदार स्थानिक विकास निधी अंतर्गत उभारण्यात आलेल्या महिला बचत भवन सभागृहाचे लोकार्पण त्यांच्या हस्ते संपन्न झाले.



यावेळी बोलताना धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, महिलांचे सक्षमीकरण हेच समाजाच्या प्रगतीचे खरे बळ आहे. महिलांना स्वावलंबी व सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून महिला बचतगटांना मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे. या सहाय्याच्या बळावर अनेक महिला स्वतःचा व्यवसाय उभा करून आत्मनिर्भरतेकडे यशस्वी वाटचाल करत आहेत, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. तसेच यापुढील काळातही महिलांच्या प्रगतीसाठी, त्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देण्यासाठी जे काही सकारात्मक करता येईल ते करण्याचा आमचा कायम प्रयत्न राहील, अशी ग्वाही ही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमास रेणा कारखाना चेअरमन अनंतराव देशमुख, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष संतोष देशमुख,रेणा कारखाना व्हा चेअरमन प्रविण पाटील, चंद्रचुड चव्हाण, तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रमोद कापसे,शहर अध्यक्ष नितीन माटेगावकर,धनंजय देशमुख, गंगासिंह कदम,प्रकाश सुर्यवंशी,शेषेराव हाके पाटील,परिसरातील नागरिक, महिला बचतगटांच्या सदस्यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.



# जळकोट वाडी (नळ )येथील इंदिरा काळे प्रशालेचा ८८ टक्के निकाल



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोटवाडी (नळ) येथील इंदिरा काळे प्रशालेचा एस एस सी बोर्ड परीक्षाचा ८८% निकाल लागला आहे. यामध्ये प्रथम क्रमांक-यश सुदाम लष्करे -८८.००% ,व्दितीय क्रमांक-श्रेया लक्ष्मण कदम-८०.२०%, तृतीय क्रमांक-मयूरी मधुकर सुरवसे-७७.४०%

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.शिवाजीराव काळे ,मु.अ.श्री. काळे जी.एस. प्रशालेतील श्री.डावरे सर,श्री.स्वामी सर,श्री. तांबे सर, श्री.काळे सर,श्री. राऊत सर, श्री.मिनाज शेख सर,श्री.वाघमारे सर सर्व शिक्षकेतर कर्मचारी व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पालक वृंद यानी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

# सीएनजी तुटवड्यामुळे महामार्गावर वाहनांच्या लागल्या रांगा ! अपघाताचा धोका वाढला अन् प्रशासनाचे दुर्लक्ष



धाराशिव (प्रतिनिधी)-शहरातील सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या वरूडा उड्डाण पुलाजवळील श्रीराम हायवे सर्विसेस सीएनजी व पेट्रोल पंपावर वाहनात इंधन भरण्यासाठी महामार्गावर मोठ्या रांगा लागत आहेत. या पंपावर सतत सीएनजीचा तुटवडा भासत असून वाहनधारकांना दोन-दोन तास रांगेत उभे राहून गॅस भरावा लागत आहे. त्यामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत असून अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

श्रीराम हायवे सर्विसेस सीएनजी व पेट्रोल पंपा सोलापूर-धुळे राष्ट्रीय मार्गावर असल्यामुळे दूरवरून अनेक वाहनधारक येतात. त्यामुळे वाहनांचीही मोठी गर्दी होत आहे. सीएनजी भरण्यासाठी लागणाऱ्या लांबलचक रांगांमुळे महामार्गावर अनेक किलो मीटरपर्यंत वाहनांची साखळी तयार होत आहे. त्यामुळे वरूडा उड्डाण पुलाजवळ धोकादायक परिस्थिती निर्माण होत आहे. महत्त्वाचे म्हणजे उड्डाण पुलावरून येणाऱ्या वाहनांचा वेग जास्त असल्यामुळे जर एखाद्या वाहन चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्यास खाली उभ्या असलेल्या वाहनांवर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एखादे वाहन उभ्या असलेल्या वाहनांवर आदळले व त्यातील गॅसचा स्फोट झाला तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उड्डाण पुलालगत असलेल्या सर्व्हिस रोडवरही देखील वाहन चालवताना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. याचा फटका शालेय विद्यार्थी, रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक सेवांना बसत आहे.

या पंपावर मोठ्या प्रमाणात वाहन गॅस भरण्यासाठी येत असल्यामुळे वाहनाची पार्किंग व्यवस्था नाही. त्यामुळे पंपचालकाने स्वतः ची स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागण्याऐवजी पंपाच्या परिसरातच व्यवस्थित व नियंत्रित राहण्यास मदत होईल.

जिल्हा प्रशासन या गंभीर समस्यकडे अक्षम्य दुर्लक्ष का करीत आहे ? शहरालगत असल्यामुळे नागरिकांची वाहने या मार्गावरून सातत्याने ये-जा करतात. शिवाय अनेक वेळा इतर कारणावरून देखील या मार्गावर वाहतुकीचा खोळंबा होत असल्यामुळे वाहनधारकांना तसेच प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ही समस्या लवकर न सोडविल्यास भविष्यात अपघात वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' ठरणार ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी: दुग्ध व्यवसायातून युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी

धाराशिव,दि.८ मे (जिमाका) पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा म्हणून पुढे येत असून,राज्याच्या एकूण उत्पन्नात या क्षेत्राचा २.८ टक्के, तर कृषी उत्पन्नातील तब्बल २५.१ टक्के वाटा असल्याचे स्पष्ट झाले आहे. वाढती लोकसंख्या, दुधाची वाढती मागणी आणि ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधी लक्षात घेता राज्य शासनाची 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' ग्रामीण युवकांसाठी आशादायी ठरणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांच्या माहितीनुसार, राज्यातील श्रमशक्ती २०३६ पर्यंत ९.०५ कोटींवर पोहोचण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर दुग्धव्यवसाय क्षेत्रात निर्माण होणाऱ्या संधी ग्रामीण युवकांसाठी रोजगाराची नवी दारे उघडणार आहेत.ग्रामीण भागात पशुपालनाकडे केवळ पारंपरिक उपजीविकेचे साधन म्हणून न पाहता, आधुनिक उद्योजकतेच्या दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

सध्या महाराष्ट्र देशातील दुग्ध उत्पादनात पाचव्या क्रमांकावर असून राज्याचे वार्षिक दूध उत्पादन १६.६२ एमएमटी (६.७ टक्के) इतके आहे. राज्यातील दूध उत्पादन वाढीचा दर ३.६ टक्के असला, तरी भारतीय आरोग्य परिषदेच्या मानकांनुसार प्रत्येक व्यक्तीस दररोज ३५८ ग्रॅम दूध आवश्यक आहे. मात्र, सध्या प्रतिव्यक्ती उपलब्धता केवळ ३०० ग्रॅम इतकी असल्याने ५८ ग्रॅमची तूट भरून काढण्याचे मोठे आव्हान राज्यासमोर आहे.

याच तुटीची पूर्तता करण्यासाठी दुग्धोत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असल्याचे पशुसंवर्धन विभागाने स्पष्ट केले आहे. 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' अंतर्गत युवकांना आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक सहाय्य आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून सक्षम केले जाणार असून,दुग्धव्यवसायाला चालना देण्याबरोबरच ग्रामीण भागात स्वावलंबनाची नवी दिशा मिळणार आहे.

राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय योजनांच्या माध्यमातून युवकांना हक्काचा रोजगार उपलब्ध करून देणे,दुग्धोत्पादनात वाढ करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान,राज्यातील ग्रामीण भागात दुग्ध व्यवसायाला चालना देत युवक, महिला बचत गट आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राबविण्यात येत असलेली 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' ही महत्त्वाकांक्षी योजना ठरत आहे. दुधाळ गाय-म्हैस पालन प्रकल्प, दुभत्या जनावरांचे वाटप,आधुनिक साधनसामुग्री आणि अनुदानाच्या माध्यमातून ग्रामीण भागात शाश्वत रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट या योजनेतून साध्य करण्यात येत आहे.

राज्यस्तरीय योजनेंतर्गत ५ दुधाळ गाय अथवा म्हैस पालन प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकासासाठी लाभार्थ्यांना ५ दुधाळ गाय किंवा म्हैस,३ वर्षांचा विमा,शेड बांधकाम तसेच विविध साधनसामुग्रीचा लाभ देण्यात येणार आहे.या योजनेचा लाभ सर्व प्रवर्गातील अल्पभूधारक,अत्यल्प भूधारक तसेच महिला बचत गटांना दिला जाणार आहे.

लाभार्थी निवड करताना अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत),अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत), वनहक्क धारक तसेच महिला बचत गटांना उतरत्या प्राधान्यक्रमाने संधी देण्यात येणार आहे. यामध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के,तर महिलांसाठी ३० टक्के आरक्षण लागू राहणार आहे.

या योजनेसाठी लाभार्थ्याकडे स्वतःची किमान १ एकर जमीन किंवा किमान ५ वर्षांचा नोंदणीकृत भाडेपट्टा असणे आवश्यक आहे.मात्र,वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही. तसेच पशुपालन व दुग्ध व्यवसायाचे शासकीय अथवा निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण घेतलेले असणे आवश्यक असून,प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापूर्वी प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहील.पर्याय म्हणून २ वर्षांचा दुग्ध व्यवसायाचा अनुभवही ग्राह्य धरला जाणार आहे.

प्रकल्पासाठी ५ गाय किंवा म्हैस खरेदीसाठी ५ लाख रुपये,विम्यासह एकूण ५ लाख ६० हजार १८० रुपये खर्च अपेक्षित आहे.याशिवाय शेड निर्मितीसाठी ३ लाख रुपये आणि कडबाकुट्टी यंत्र, फॉगिंग मशीन,खाद्य-पाण्याची भांडी, मिल्किंग मशीन,दूध कॅन,फवारणी यंत्र, सोलर व्यवस्था व इतर साहित्यांसाठी २ लाख ७५ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे.अशाप्रकारे प्रकल्पाची एकूण किंमत ११ लाख ३५ हजार १८० रुपये इतकी निश्चित करण्यात आली आहे.

अनुदानाच्या स्वरूपात सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के म्हणजे ५ लाख ६७ हजार ५९० रुपये,तर अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना ७५ टक्के म्हणजे ८ लाख ५१ हजार ३८५ रुपये इतके अनुदान देण्यात येणार आहे. हे अनुदान दोन टप्प्यांत वितरित केले जाणार असून,पहिल्या टप्प्यात शेड निर्मिती व साधनसामुग्री खरेदीनंतर ५० टक्के अनुदान देण्यात येईल. उर्वरित ५० टक्के अनुदान जनावरांच्या खरेदीनंतर देण्यात येणार आहे.

दरम्यान,जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुभत्या जनावरांचे वाटपही करण्यात येणार आहे. या योजनेत लाभार्थ्यांना १ दुभती गाय किंवा म्हैस तसेच २ दुभत्या गायी-म्हशींचे गट उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यासोबत ३ वर्षांचा विमाही दिला जाणार आहे.

या योजनेत भूमिहीन लाभार्थ्यांनाही १ गाय अथवा म्हैस गटासाठी संधी देण्यात आली आहे.तर २ गायी अथवा म्हशींच्या गटासाठी किमान १ एकर जमीन आवश्यक राहणार आहे. वनहक्क धारकांना मात्र ही अट लागू राहणार नाही. २ गायी-म्हशींच्या गटासाठी पशुपालन व्यवसायाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र अथवा २ वर्षांचा अनुभव आवश्यक करण्यात आला आहे.

१ जनावरासाठी अंदाजे १ लाख १२ हजार ३६ रुपये, तर २ जनावरांच्या गटासाठी २ लाख २४ हजार ७२ रुपये खर्च अपेक्षित आहे.यामध्ये विमा रक्कमेचाही समावेश आहे.सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५० टक्के, तर अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेत पशुसंवर्धन क्षेत्राचा २५ टक्क्यांहून अधिक वाटा असल्याने या क्षेत्राचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे.वाढती श्रमशक्ती आणि दुधाची वाढती मागणी लक्षात घेता पशुसंवर्धन हा केवळ शेतीपूरक व्यवसाय न राहता एक प्रभावी 'बिझनेस मॉडेल' म्हणून पुढे येत आहे.

प्रती व्यक्ती दुधाची उपलब्धता वाढवत त्या माध्यमातून उद्योजकतेची मोठी संधी निर्माण होत आहे.'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या माध्यमातून ग्रामीण युवकांना आधुनिक तंत्रज्ञान,उत्तम व्यवस्थापन आणि आर्थिक साखळीशी जोडले जात आहे.या योजनेमुळे केवळ दुग्धोत्पादन वाढणार नाही,तर ग्रामीण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर शाश्वत रोजगार निर्माण होईल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# सीईटी परीक्षांसाठी प्रशासन सतर्क परीक्षा केंद्रांवर कडक निर्बंध

धाराशिव (जिमाका) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र,व्ही प्लॅनिंग व कृषी तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या MBA/MMS CET-2026 (Phase-2) तसेच MHT-CET 2026 (PCM d PCB) (Phase-2) परीक्षांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.अपर जिल्हादंडाधिकारी,धाराशिव यांनी जारी केलेल्या आदेशानुसार,परीक्षा काळात केंद्र परिसरातील शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच परीक्षार्थींना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात विविध निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

MBA/MMS CET-2026 (Phase-2) ही परीक्षा ९ मे रोजी धाराशिव शासकीय तंत्रनिकेतन येथे दोन सत्रांत होणार आहे. सकाळचे सत्र सकाळी ७.३० ते दुपारी १२ वाजेपर्यंत,तर दुपारचे सत्र दुपारी १२.३० ते सायंकाळी ६.४५ वाजेपर्यंत पार पडणार आहे.

MHT -CET-2026 (PCB) (Phase-2) परीक्षा १० व ११ मे रोजी तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय,धाराशिव तसेच शासकीय तंत्रनिकेतन येथे आयोजित करण्यात आली आहे.ही परीक्षा देखील दोन सत्रांत पार पडणार असून सकाळी ७.३० ते दुपारी १२ आणि दुपारी १२.३० ते सायंकाळी ६.४५ अशी वेळ निश्चित करण्यात आली आहे.

MHT -CET-2026 (PCM) (Phase-2) परीक्षा १२ मे ते २० मे या कालावधीत (दि. १६,१७ व १८ मे वगळून) तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय व शासकीय तंत्रनिकेतन,धाराशिव येथे होणार आहे.प्रथम सत्रात सकाळी ७.३० ते दुपारी १२ वाजतापर्यंत आणि दुपारी १२.३० ते सायंकाळी ६.४५ वाजेपर्यंत राहील.

प्रशासनाच्या आदेशानुसार परीक्षा केंद्र परिसरात घोषणाबाजी,गोंधळ किंवा शांततेस बाधा पोहोचवणारी कोणतीही कृती करण्यास मनाई करण्यात आली आहे.परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर,पानटपऱ्या, टायपिंग सेंटर,एसटीडी बूथ,संगणक केंद्रे, इंटरनेट कॅफे आदी आस्थापना बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच मोबाईल फोन,सेल्युलर फोन, फॅक्स,ई-मेल सुविधा,रेडिओ,इंटरनेट साधने,संगणक,कॅलक्युलेटर किंवा तत्सम उपकरणे परीक्षा केंद्र परिसरात घेऊन जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.परीक्षा केंद्र परिसरात कोणत्याही वाहनांना प्रवेश दिला जाणार नाही.

परीक्षेशी संबंध नसलेल्या व्यक्तींना केंद्रात प्रवेश बंदी करण्यात आली असून केवळ परीक्षा केंद्रावरील अधिकारी-कर्मचारी, शासकीय कामावरील कर्मचारी,संबंधित शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक,कर्मचारी आणि परीक्षार्थी यांनाच प्रवेश दिला जाणार आहे.

परीक्षार्थींच्या नातेवाईकांनाही प्रवेश दिला जाणार नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.याशिवाय परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे.हे आदेश ९ मे रोजी सकाळी ७ वाजतापासून २० मे रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत लागू राहणार आहेत.आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ नुसार गुन्हा दाखल करून फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# मटका जुगाराचे साहित्या जप्त

नळदुर्ग (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान नळदुर्ग पोलीसांनी दि.०७.०५.२०२६ रोजी नळदुर्ग पोलीस ठाणे हद्दीत बसस्थानक नळदुर्गच दक्षिणेकडील वॉल कंपाउंडच्या आडोशाला छापा टाकला. यावेळी बसवराज वय ४५ वर्षे, रा. कुटेकुर ता. उमरगा ह.मु. नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव हे बसस्थानक नळदुर्गचे दक्षिणेकडील वॉल कंपाउंडच्या आडोशाला मेन बाजार मटका जुगाराचे साहित्या असा एकुण १,८२० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले नळदुर्ग पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


**मध्य रेल्वे**

**सोलापुर मंडळ**

**ओवरहेड उपकरण कार्य**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांकरिता प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा क्रमांक: SUR/TRD/T/2026/12. कामाचे नाव:** सोलापूर विभागात OHE संरचनांवर (ड्रॉप आर्म) रेट्रो-रिफ्लेक्टिव्ह क्रमांक फलक बसवणे आणि जुन्या MS बॉन्ड्सच्या जागी GI बॉन्ड्स बदलणे. **अंदाजित खर्च:** १,६४,५८,९८२/-. **निविदा सुरक्षा:** ३,२९,२००/-. **कामाचा कालावधी:** १२ महिने. **प्रस्तावाची वैधता:** ६० दिवस. **संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** ०२.०६.२०२६ रोजी १५:०० वाजता.

**वरि. मं. वि. अ. (क. वि.)**

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा 19

**मध्य रेल्वे**

**सोलापुर मंडळ**

**गोदाम विकास कार्य**

डीआरएम (W), मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामासाठी प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. **निविदा सूचना क्र.: 13-2026-SrDEN Co. कामाचे नाव:** उस्मानाबाद गुड्स शेड येथील विकास कामे. **कामाचा अंदाजित खर्च:** १४,०४,५६,३७५.२१/-, **अनामत रक्कम:** २८,०९,१००/-, **कामाचा पूर्तता कालावधी:** १२ महिने. **देखभाल कालावधी:** २४ महिने, **निविदा अर्जाची किंमत:** शून्य. www.ireps.gov.in या **संकेतस्थळावर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** २७.०५.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in या **संकेतस्थळावर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** २७.०५.२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर. **संकेतस्थळाचा तपशील: www.ireps.gov.in. टीप:** इच्छुक निविदाकारांना असा सल्ला देण्यात येतो की, निविदा बंद होण्याच्या अंतिम तारखेपूर्वी, या निविदेसंदर्भात जारी करण्यात आलेला कोणताही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

**मं. रे. व्य. (कार्य)**

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा 24



सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649